दैनिक

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

# समर्थ राजयोग

वैभव विवेक स्वामी
सपादक

राजमान्य, राजशक्ती

SAMARTH RAJYOG

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...


बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष – ६ वे अंक –८२ | गुरूवार दि.२७ नोव्हेंबर २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू । पाने ४


Beed Daily Marathi | Year-6th | Issue-82 | Thursday, Dt.27 November 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4


# बीड नगरपालिकेत बटेंगे तो कटेंगे परिस्थिती!

## भाजपा आणि दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात काट्याची लढत ?

## एमआयएम, काँग्रेस, आम आदमी पार्टी आणि वंचित ठरणार चेंजर..!!



**बीड / वैभव स्वामी**

बीड जिल्ह्यातील सहा नगरपालिकेमध्ये घमासान राजकीय संघर्ष गुलाबी थंडीत देखील पेटला आहे. जिल्ह्यातील स्थानिक नेत्यांसह पक्षप्रमुखांनी आणि नेतृत्वाने सभेला सुरुवात करून राजकीय वातावरणाला गरिमा निर्माण केली आहे. बीड नगरपालिकेमध्ये मात्र विकासाचा मुद्दा आता हळूहळू अडगळीला पडला असून विखारी जातीय समीकरणावर राजकारण येऊन ठेपले आहे. आपल्या राजकीय स्वार्थासाठी याला जातीय रंग हळूहळू दिला जात असल्यामुळे आता गल्लोगल्लीत होणार आणि मोहल्या मोहल्यामध्ये सुप्त आवाजात दोन्ही गटांमध्ये नारा दिला जात आहे बटेंगे तो कटेंगे.. त्यामुळे या निवडणुकीत धक्कादायक निकाल लागण्याची शक्यता नाकारता येत नाही.

बीड नगरपालिकेची खरी लढत ही शरद पवार यांचे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ,भारतीय जनता पार्टी आणि अजित दादा यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अशी तिरंगी लढत होणार असली तरी देखील या लढतीमध्ये एमआयएम, काँग्रेस आय, आम आदमी पार्टी आणि वंचित बहुजन आघाडी किती मते आपल्या पदरात पाडून घेतात आणि अपक्षांची मदार किती मतांपर्यंत जाते यावर विजयी उमेदवाराचे भवितव्य ठरणार असल्यामुळे विजयी उमेदवाराला एक ना एक मत महत्त्वाचे ठरणार आहे यात शंका नाही.

बीड जिल्ह्यात सहा नगरपालिकांच्या निवडणुका होत आहेत. बीडमध्ये तिरंगी लढत होण्याची शक्यता आहे. तर गेवराई मध्ये भारतीय जनता पार्टी विरुद्ध अजित पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अशी सरळ लढत आहे. माजलगाव नगरपालिकेमध्ये तिरंगी लढत होण्याची शक्यता आहे. यामध्ये अजित दादा पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस विरोधात भारतीय जनता पार्टी त्याचबरोबर शरद पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अशी प्रमुख लढत राहणार आहे. परळी नगरपालिकेमध्ये आमदार धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखालील महायुती विरुद्ध महाविकास आघाडी अशी सरळ दुरंगी लढत होण्याची शक्यता आहे. अंबाजोगाई नगरपालिकेमध्ये देखील अजित पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस विरुद्ध भारतीय जनता पार्टी अशी सरळ दुरंगी लढत होईल. धारूर नगरपालिकेमध्ये तिरंगी लढत होण्याची शक्यता आहे. अजितदादा पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस विरुद्ध भारतीय जनता पार्टी या दोघांमध्ये खऱ्या अर्थाने चुरस राहील. या सर्व निवडणुकांमध्ये आता हळूहळू रंगत येऊ लागली आहे.

बीड नगरपालिकेची निवडणूक ही विकासावरून थेट जातीवर उतरवली आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. बीड नगरपालिकेमध्ये मुस्लिम मतदार हे निर्णायक मतदार आहेत. जर मुस्लिम मतदारांनी एक निर्णय घेऊन ज्या ही उमेदवाराच्या पाठीशी मतांची ताकद देऊन उभा राहण्याचा संकल्प केला तर त्या उमेदवाराला पराभूत करणे इतर पक्षांना निश्चितच अवघड जाणार आहे. आज तरी मुस्लिम समाजाला आपला वाटणारा उमेदवार म्हणजे अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या उमेदवार प्रेमलता पारवे या शेख मुजीब यांच्या सासू असल्यामुळे पहिल्या पसंती मध्ये आहेत.अजित दादा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री आहेत.जर त्यांच्या ताब्यात बीड नगरपालिका दिली तर येणाऱ्या काळात बीड शहराचा सर्वांगीण विकास होईल असा विश्वास अजित दादांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी मतदारांना देत आहे. मुस्लिम मतदारांसोबतच जर इतर सर्व समाजाची मते अजित दादा पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पारड्यात या मुद्द्यावर मिळू शकली तर सर्वात प्रभावी उमेदवार म्हणून घड्याळ ठरू शकेल.

मात्र दुसरीकडे शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने सर्वसामान्य जनतेची सेवा करणारा अनुसूचित जातीला न्याय देणारा उमेदवार म्हणून विष्णू भैया वाघमारे यांच्या सुविद्य पत्नी सौ स्मितताई वाघमारे यांना संधी दिली आहे. या उमेदवाराला आंबेडकरी समाजाने जाहीर पाठिंबा देऊन पाठबळ दिलेले आहे.दुसरीकडे या उमेदवारांच्या पाठीशी खंबीरपणे बीड नगरीचे माजी नगराध्यक्ष तथा माजी आमदार सय्यद सलीम हे भक्कम पणे पाठीशी उभे असल्यामुळे मुस्लिम समाजामध्ये एक विश्वास निर्माण करण्यात सय्यद सलीम यशस्वी ठरत आहेत. दुसरीकडे एक प्रामाणिक लढाऊ अडी अडचणीला मदतीला येणारा आमदार म्हणून संदीप भैया क्षीरसागर यांच्याकडे मुस्लिम समाजासह सर्व समाज पहात असल्यामुळे आज तरी शरद पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ही सत्तेत नसताना सुद्धा जनतेच्या मनामध्ये नंबर एकचे स्थान करून खंबीरपणे उभी आहे. जर हीच परिस्थिती राहिली तर शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा विजयी रथ रोखणे सहज शक्य होणार नाही. दुसरीकडे जर मुस्लिम मतांची विभागणी झाली आणि ओबीसी सह कट्टर हिंदुत्ववादीची मतं भारतीय जनता पार्टीच्या पारड्यात पडली तर भाजपाचा अनपेक्षित होणारा विजय रोखणे देखील सहज सोपे ठरणार नाही. त्यामुळे बीड नगरपालिकेची निवडणूक ही खऱ्या अर्थाने तिरंगी होणार असली तरी देखील या निवडणुकीमध्ये एमआयएम पक्षाचा पतंग कोणत्या उमेदवाराचा धागा कट करतो आणि आपला पतंग उडवण्यात किती सक्षम होतो हे मतांवर अवलंबून ठरणार आहे. एम आय एम चे बीड जिल्हा प्रमुख अँड शेख शफिक भाऊ हे मुस्लिम समाजाच्या गळ्यातील ताईत असल्यामुळे मुस्लिमांची मते मोठ्या संख्येने घेऊ शकले तर चमत्कार घडू शकेल.याशिवाय त्यांची हिंदू समाजामध्ये देखील एक चांगली छबी असल्यामुळे मुस्लिम मतांसह जर ते इतर हिंदूंची मते देखील घेऊ शकले तर चित्र आणखीनच बदलू शकते.

या सोबतच पुरोगामी आणि सर्व समाजाला सोबत घेऊन चालणारा पक्ष म्हणून काँग्रेस पक्षाकडे पाहिले जाते. काँग्रेस पक्षाचे माजी मंत्री अशोकराव पाटील यांनी देखील एका सामान्य अनुसूचित जातीतील उमेदवाराला संधी देऊन चांगला चेहरा दिल्यामुळे काँग्रेस पक्ष देखील मुस्लिम मतांसह अनुसूचित जातीसह सर्व जाती धर्मातील मते संख्येने तुलनात्मक घेऊ शकतो. हे दोन प्रमुख पक्ष किती मते घेतात यावर विजयी उमेदवारांचे भवितव्य ठरणार आहे. त्याचबरोबर आम आदमी पार्टी कोणत्या उमेदवारांच्या आशेवर आपला झाडू फिरवते आणि वंचितचा उमेदवार आपला मतांचा गॅस किती पेटवतो यावर देखील विजयी उमेदवारांचे भवितव्य अवलंबून ठरणार आहे.

अपक्ष उमेदवारांना देखील डावलून चालणार नाही. त्यामुळे अपक्ष उमेदवार किती मते घेतात यावर देखील विजयी उमेदवाराचे भवितव्य अवलंबून असल्यामुळे या निवडणुकीत विजयी उमेदवाराला एक एक मत हे महत्त्वाचे ठरणार आहे यात शंका नाही. शेवटच्या क्षणापर्यंत वारं कोणत्या उमेदवाराच्या दिशेने कसं फिरत राहील हे हळूहळू कळेल एक मात्र नक्की गल्लोगल्लीत आणि मोहल्या मोहल्यामध्ये चर्चेला रंग येत आहे अगर बटेंगे तो कटेंगे.

### वीरशैव लिंगायत समाजाची मते देखील करिष्मा दाखवणार ?

बीड नगरपालिका अंतर्गत वीरशैव लिंगायत समाजाची मते ही निर्णय मते ठरणार आहेत. या समाजातील उच्चशिक्षित तरुण उमेदवार म्हणून दिव्या महेश स्वामी हिने अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केलेला आहे. तिला शिट्टी हे चिन्ह मिळाले आहे. दिव्या स्वामी हे केज मतदार संघाचे पहिले आमदार ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी स्वर्गीय रामलिंग स्वामी यांची नात आणि केज विधानसभा निवडणूक दोन वेळा लढवलेले पत्रकार वैभव स्वामी यांची बहीण असल्यामुळे वीरशैव लिंगायत समाज हा अपक्ष उमेदवार दिव्या स्वामी हिची शिट्टी मतपेटी मधून कशी वाजवतात यावर देखील विजयी उमेदवारांचे ठरणार असल्यामुळे या निवडणुकीत वीरशैव लिंगायत समाजाला मोठे महत्व आले आहे यात शंका नाही.

## प्रभाग ७ वार्डाचा चेहरा मोहरा बदलण्यासाठी सक्षम उमेदवार जगदीश गुरखुदे आणि भाग्यश्री देशपांडे यांचे कमळ जनताच फुलवणार !

# मतदारांनीच निवडणूक हातात घेतल्यामुळे विरोधकांचे डिपॉझिट गुल होणार ?

**बीड /प्रतिनिधी**

**बीड नगरपालिका अंतर्गत भारतीय जनता पार्टीचे एकमेव निवडून आलेले नगरसेवक जगदीश फुलचंद गुरखुदे यांचे सर्व समाजासोबत असलेले स्नेहसंबंध आणि अविरत पणे सुरू असलेला विकास त्यांच्या विजयावर शिक्कामोर्तब करणार आहे. सर्वसामान्य जनतेच्या अडीअडचणीसाठी अर्ध्या रात्री सक्षम पणे उभे राहणारे नेतृत्व म्हणून जनतेने अनुभवलेले आहे. यामुळे प्रभाग क्रमांक ७ मधून भारतीय जनता पार्टीचे अधिकृत उमेदवार जगदीश फुलचंद गुरखुदे आणि सौ भाग्यश्री सागर देशपांडे हे दोघेही सर्वाधिक मताने निवडून येतील आणि विरोधकांचे डिपॉझिट गुल करतील अशी शक्यता आहे.निवडणुकीच्या पहिल्याच टप्प्यात मतदारांनीच ही निवडणूक हातात घेतल्यामुळे पहिल्याच टप्प्यात चर्चेला उधाण आले आहे हे वास्तव नाकारून चालणार नाही.**

मागील २५ वर्षापासून प्रभाग क्रमांक सात सह संपूर्ण बीड शहर, जिल्हा यांना नगरसेवक जगदीश फुलचंद गुरखुदे यांचे सामाजिक कार्य सर्वश्रुत आहे. एकनिष्ठ आणि तत्वनिष्ठ असलेल्या गुरखुदे कुटुंबीयांवर मुंडे परिवाराचे विशेष प्रेम राहिलेले आहे. लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांचे लाडके कार्यकर्ते आणि मंत्री पंकजाताई मुंडे यांचे विश्वासू म्हणून गुरखुदे कुटुंबीयांना पाहिले जाते. त्यामुळेच बीड नगरपालिकेमध्ये सत्ता नसताना सुद्धा कोणाची जात पात न पाहता प्रभागातील सर्व जनतेच्या अडचणी सोडवण्याचे काम केले.या प्रभागाचा विकास व मूलभूत सुविधांचे काम त्यांनी प्रामाणिकपणे पार पाडले.कोरोना महामारीच्या कार्यकाळात २००० पेक्षा अधिक गरजवंतांना घरपोच जेवणाचे डबे निस्वार्थ भावनेने या परिवाराने दिले. अनेकांचे कोरोना मध्ये जीव वाचवले. कायम अन्नदान, दवाखान्यासाठी मदत, एवढेच नव्हे कोणताही पिढीत व्यक्ती कोणत्याही मदतीसाठी द्वारकाधीश मित्र मंडळाकडे गेला आणि तो निराश होऊन परत गेला असा एकही व्यक्ती शोधूनही सापडणार नाही. चोर गल्ली, कबाड गल्ली, केंडे गल्ली येथे पेव्हर ब्लॉकचा रस्ता तयार केला, भूमिगत नाल्या केल्या, सौर ऊर्जेवरील स्ट्रीट लाईट उभी केली, ज्येष्ठ नागरिकांना बसण्यासाठी बेंच जागोजाग उभे केले. महिलांच्या सुरक्षिततेसाठी या प्रभागात सीसीटीव्हीचे कॅमेरे बसवले.पत्रपेटी उभ्या केल्या, जागोजाग बोर्ड, ट्री गार्ड सहित झाडे लावून वॉर्ड हरितमय केला. स्वच्छतेकडे कायम लक्ष केंद्रित ठेवले, नऊपैकी पाच ठिकाणी २४ तास पाण्याची सुविधा कायम ठेवली. पंतप्रधान घरकुल योजना असेल लाडकी बहीण योजना असेल या प्रभागासाठी प्रभावीपणे राबवली. यासह सातत्याने सामाजिक विविध उपक्रम राबवून एक अनोखा पायंडा निर्माण केला. विविध समस्यांचे निवारण करून कायम विविध विकासाची कामे केली. कायम देशहितासाठी सर्वस्व अर्पण करणारे देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांचे विचार सबका साथ सबका विकास प्रत्यक्षात राबवला. त्यांचा आदर्श समोर ठेवून मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वाखाली कायम विकासाचे कार्य केले. बीड नगरपालिकेत आता डॉक्टर योगेशभैया क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली निवडणूक लढवण्यासाठी यंत्रणा सक्षमपणे हातात घेतली आहे.

प्रभाग क्रमांक सात चा चेहरा मोहरा बदलण्यासाठी कमळ या चिन्हा समोरील बटन दाबून प्रभाग क्रमांक ७ ब चे भारतीय जनता पार्टीचे अधिकृत उमेदवार जगदीश फुलचंद गुरखुदे आणि प्रभाग क्रमांक ७ अ च्या अधिकृत उमेदवार सौ देशपांडे भाग्यश्री सागर यांच्या कमळ या चिन्हावर बटन दाबून त्यांना सर्वाधिक बहुमताने निवडून देण्यासाठी आता जनताच सज्ज झाली आहे. या प्रभागातील मतदारांनीच निवडणूक हातात घेतल्यामुळे हे दोन्ही उमेदवार भारतीय जनता पार्टीमध्ये सर्वाधिक मताने निवडून येणारे उमेदवार ठरतील आणि या प्रभागातून नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार डॉक्टर सौ ज्योती रवींद्र घोमरे ( घुंबरे ) यांना सर्वाधिक मते देणारा वॉर्ड म्हणून देखील प्रभाग क्रमांक ७ इतिहास निर्माण करेल यात शंका नाही.




### प्रभागाचे द्वारकाधीशच..

या प्रभागाच्या सर्वांगीण विकासासाठी झटणारे नगरसेवक जगदीश गुरखुदे आणि त्यांच्या विकासात्मक व्हिजनला खंबीर साथ देणारे त्यांचे बंधू परशुराम गुरखुदे आणि परिवारासह जिवाला जीव देणारी त्यांची द्वारकाधीश टीम खऱ्या अर्थाने या प्रभागातील जनतेला दिलासा आणि विश्वास देणारी म्हणून जनतेच्या पसंतीला नंबर एक ठरली आहे.

ही पसंती मतदार मतपेटीतून व्यक्त करतील आणि भविष्यात या वार्डातून गुरखुदे यांच्या विरोधात उभ राहण्याचे धाडस देखील कोणी करणार नाही. इतका विकास ते करून दाखवतील अशी चर्चा आजच होत आहे. त्यामुळे ते या प्रभागाचे कायम द्वारकाधीश असतील असे म्हटले जात आहे.

### सबका साथ म्हणजे प्रभाग सात...

गुरखुदे कुटुंबियांमुळे सगळ्यांना साथ देणारा प्रभाग म्हणजे सात म्हणून ओळखले जाते. ही ओळख गुरखुदे कुटुंबियांनी आपल्या प्रामाणिक आणि अथक परिश्रमातून उभी केली आहे यात शंका नाही.

# नंदू काका हाच आंबेजोगाईकरांचा सखा

## आता नको आहेत पापाच्या थापा

अंबाजोगाई / प्रतिनिधी

आंबेजोगाई शहराचा कधीच नव्हे एवढा चेहरामोहरा बदलण्याचे काम आपल्या आमदार सुनबाईच्या माध्यमातून नंदकिशोर मुंदडा यांनी केले आहे. तेंव्हा नंदू काका हाच आंबेजोगाईकरांचा सखा अशीच काहीशी भावना सध्या शहरात दिसून येत आहे. तर याउलट अगदी दीर्घकालीन नगराध्यक्ष पदासारखे प्रथम नागरिक दर्जाचे पद मोदी कुटुंबाला महिला आणि पुरुष या दोन्ही संवर्गांच्या माध्यमातून देऊन सुद्धा आंबेजोगाईकर चक्क पाण्या वाचून तरपडतोय यापेक्षा अजून काय वाईट बाब असावी. अशी ही चर्चा संपूर्ण शहर ऐकावयास मिळत आहे.



अगदी पाची पक्कवानांच्या मेजवानीचे ताट जरी पोटभरून खाल्ले तरी वरतून पाण्याचे दोन घोट पिल्याशिवाय ते घास घशाखाली उतरत नाहीत आणि ते खाल्लेले अन्न पचन होत नाही. आणि मग आंबेजोगाईकरांनी गेली २५ वर्ष राजकिशोर पापा मोदी यांना एक हाती सत्ता देऊन सुद्धा आंबेजोगाईकरांची तहान ते कदापी भागवू शकले नाहीत. उलट तहानलेल्या

(उर्वरीत पान २ वर)

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
Bureau of Indian Standards
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ
सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर,
सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5

दैनिक समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG



# बीडला बदनाम करणाऱ्यांना हद्दपार करा – मंत्री पंकजा मुंडे

## बीड भाजपच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार डॉ.ज्योती रविंद्र घुंबरे यांच्यासह नगरसेवकांच्या प्रचारार्थ डॉक्टर व वकील संघाचा संयुक्त मेळाव्यास उस्फुर्त प्रतिसाद



बीड /प्रतिनिधी

डॉ.योगेश, डॉ.सारिका हे राजकीय संकटात अडकले होते. त्यांना वाट दाखवली होती, परंतु ती वाट आमच्याच पक्षापर्यंत येऊन थांबेल, असे कधी वाटले नाही. त्यांच्या माध्यमातून भाजपने सुशिक्षित व सुसंस्कृत उमेदवार डॉ.ज्योती घुंबरे यांना संधी दिली. मी राज्याची पर्यावरण मंत्री असल्याने शहरातील स्वच्छता, पाणी, पर्यावरण प्रश्नावर प्राधान्याने काम करणार आहे. वकील, डॉक्टरांचे प्रश्नही अग्रक्रमाने सोडविले जातील. त्यासाठी शहरातील सर्व सुजान डॉक्टर, वकील संघटनांनी डॉ.ज्योती रविंद्र घुंबरे (घोमरे) यांच्या पाठीशी उभे राहून त्यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करावे, असे आवाहन भाजपच्या सचिव, पर्यावरण तथा पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी केले.

बीडच्या भाजपच्या नगराध्यक्षपदाच्या अधिकृत उमेदवार डॉ.ज्योती रविंद्र घुंबरे यांच्या प्रचारार्थ डॉक्टर व वकील संघाचा संयुक्त मेळावा बुधवारी (दि.२६) आयोजित करण्यात आला होता. यावेळी त्या बोलत होत्या. व्यासपीठावर भाजपचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, जिल्हा सरचिटणीस ड.सर्जेराव तांदळे, जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ शिराळे, डॉ.सारिका क्षीरसागर, शहराध्यक्ष अशोक लोढा, डॉ.आदित्य सारडा, देविदास नागरगोजे, वकील संघाचे प्रभारी अध्यक्ष ड.रघुनाथ देशमुख, सचिव ड.एस.आर.काळे, आयएमएचे अध्यक्ष डॉ.अनंत मुळे, सचिव डॉ.अमोल गीते, एचआयएमएचे अध्यक्ष डॉ.लक्ष्मण जाधव, ड.महेश गर्जे, सचिव डॉ.सतीश लड्डा, भाजप डॉक्टर सेलचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ.अभय वनवे, भालकेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ड.जयंत राख, एनआयएमएचे अध्यक्ष डॉ.अजित जाधव, सचिव डॉ.रमेश घोडके, ड.संगीता धसे, डॉ.रवींद्र घुंबरे यांच्यासह शहरातील मोठ्या संख्येने डॉक्टर व वकील उपस्थित होते.पुढे बोलताना पंकजाताई मुंडे म्हणाल्या, पाणी पुरवठा व रस्त्यांच्या कामांसाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून दिला आहे. विकासकामांचा हिशोब मांडण्याची सवय नसली तरी बीडच्या विकासासाठी आपण पूर्णपणे समर्पित आहे. डॉ.ज्योती घुंबरे ह्या सुसंस्कृत व सुशिक्षित चेहरा आहेत. निवडणुकीच्या काळात जात व धर्माच्या मुद्द्यांवर चर्चा होणे दुर्दैवी आहे. परंतु, महिलांना संधी देणारे पोषक वातावरण बीडमध्ये निर्माण झाले असल्याचे त्या म्हणाल्या. बीडला बदनाम करणाऱ्यांविरोधात आवाज उठवून त्यांना हद्दपार केले पाहिजे, असेही ठणकावून सांगितले. राजकारणात खस्ता खाऊनही आम्ही कार्य करत आहोत. कमळावरच राजकारण व समाजकारण सुरू राहील, असे त्या म्हणाल्या. सुशिक्षित व सुसंस्कृत डॉ.ज्योती घुंबरे यांच्या पाठीशी उभे राहण्याचे आवाहन त्यांनी केले. डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या संदर्भातील संकटांचा उल्लेख करताना पंकजाताईंनी सांगितले की, जुन्या पक्षात असताना त्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागले. संघर्ष कितीही मोठा असला तरी सत्याची वाट सोडू नका, असा सल्ला त्यांनी दिला. डॉक्टर व वकिलांनी मांडलेले प्रश्न प्राधान्याने सोडविले जातील, अशी ग्वाही देत भाजपच्या डॉ.ज्योती घुंबरे यांच्यासह सर्व उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन केले. सुरुवातीला संविधान दिनानिमित्त संविधान पुस्तकेचे पूजन करण्यात आले. तसेच, २६/११ च्या मुंबई हल्ल्यातील हुतात्म्यांना आदरांजली अर्पण केली. यावेळी शहरातील डॉक्टर, वकिलसांसह नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

### बीड नगरपरिषदेच्या सभागृहात कमळ फुलविणार –डॉ.योगेश क्षीरसागर

डॉ.योगेश क्षीरसागर यांनी मेळाव्यात बोलताना म्हटले की, पंकजाताई मुंडे ह्या माझ्या संकटमोचक असून नेहमीप्रमाणे संकटसमयी पाठीशी उभ्या राहिल्या. त्यांचे नेतृत्व बलाढ्य आहे. विरोधकांकडे जात, धर्मपलिकडे विकासाचे कोणतेही व्हिजन नाही. माझे वडील डॉ.भारतभूषण क्षीरसागर यांनी शहरवासीयांची सेवा केली म्हणूनच बीडकरांनी त्यांना तब्बल ३५ वर्षे नगराध्यक्ष म्हणून संधी दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व तत्कालीन पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वाखाली २ टप्प्यात २०० कोटी रुपयांचे रस्त्यांचे काम पूर्ण झाले असून अनेक विकासकामे झाली आहेत. बीड शहर शांत व सुरक्षित ठेवण्यासाठी आपण कायम प्रयत्नशील राहिलो आहोत. दोन समाजांमधील तेढ वाढत असल्याने पंकजाताईंच्या पुढाकारातून ते कमी करण्यासाठी प्रयत्न व्हावेत, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. मागील ३५ वर्षांपासून आपण निवडून येत असून वारंवार पराभूत होणारे लोक आता बीडमध्ये येऊन आम्हाला धडे देत आहेत. यांचा उद्देश विकास नसून केवळ स्वार्थ आहे. 'गेवराईचे पार्सल परत पाठवू' आणि 'बीड नगरपरिषदेच्या सभागृहात निश्चितच कमळ फुलवू' असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

### पंकजाताईंच्या हस्ते डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांच्या संपर्क कार्यालयाचे उद्घाटन

पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते बीडमध्ये माने कॉम्प्लेक्स येथे भाजपच्या नगरसेवक पदाच्या उमेदवार डॉ.सारिका क्षीरसागर व आदित्य (सनी) माने यांच्या संपर्क कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, डॉ.योगेश क्षीरसागर, नगराध्यक्षपदाच्या उमेदवार डॉ.ज्योती घुंबरे, नवनाथ शिराळे, शहराध्यक्ष अशोक लोढा, मुन्ना फड, संग्राम बांगर यांच्यासह भाजपचे सर्व पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. त्यानंतर पंकजाताईंनी ड.आप्पाराव जगताप यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. यादरम्यान भाजपच्या पदाधिकाऱ्यांसोबत चर्चा केली.

## संपादकीय

### स्मरण २६/ ११ चं

२६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याला आज बरोबर सतरा वर्षे पूर्ण झाली. कटू आठवणी खरेतर उगाळत बसू नयेत. ही आठवणही तो हल्ला, कसाब, त्याचे दुःसाहस, त्यात शहीद झालेले करकरे-साळस्कर-कामटे हे अधिकारी किंवा तुकाराम ओंबळेंसारख्या शूर शिपायाने स्वतःच्या बलिदानाने पकडून दिलेला ढळढळीत पुरावा या अंगाने काढायची नाहीच आहे. मुंबई वाचवण्यासाठी या थोर सुपुत्रांनी दिलेले बलिदान कृतज्ञतापूर्वक सतत आपल्या स्मरणात राहणारच आहे. आठवण करायची यासाठी, की मुंबईवरील या हल्ल्यानंतर दहशतवादी कारवायांचा बंदोबस्त किती झाला आणि काहीच दिवसांपूर्वी त्याचे दिल्लीत दिसलेले रूप नक्की कसे समजायचे? याचे भविष्याच्या दृष्टीने आकलन होण्यासाठी. २००८ मध्ये मुंबईवर झालेल्या हल्ल्यानंतर २०१० मध्ये पुण्यात जर्मन बेकरीजवळ बॉम्बस्फोट झाला. त्यानंतर सप्टेंबर २०११ मध्ये दिल्ली उच्च न्यायालयाजवळ साखळी बॉम्बस्फोट झाले. दिल्लीतल्या त्या बॉम्बस्फोटात ३० जणांचे बळी गेले. २०११ ते २०२५ अशी सुमारे १४ वर्षे दिल्ली शांत राहिली. त्यानंतर या महिन्यात, १० नोव्हेंबर रोजी लाल किल्ला मेट्रो स्टेशनच्या पार्किंग आवारात स्फोटक रसायनांच्या गाडीच्या स्फोटाने देशाला हादरा दिला. त्यात १३ जण ठार, तर ३० जण जखमी झाले. १४ वर्षांपूर्वी दिल्लीत झालेल्या बॉम्बस्फोटात ३० जण ठार झाले होते! मुंबईवरील हल्ल्यानंतर १७ वर्षांनी आणि दिल्लीतील हल्ल्यानंतर १४ वर्षांनी झालेल्या या बॉम्बस्फोटांमध्ये दहशतवादी कारवाया झाल्याच नाहीत, असे नाही. ज्या झाल्या, त्या मुख्यतः जम्मू-काश्मीरच्या खोऱ्यात झाल्या. ७-८ जणांपेक्षा अधिक बळी गेल्याच्या दुर्घटना देशाच्या अन्य भागांत कुठे झाल्या नाहीत. १९८९ पासून धुमसत असलेल्या जम्मू - काश्मीरमध्येच त्या होत होत्या. पठाणकोट, पुलवामा आणि पहलगाम ही त्याची ठळक उदाहरणे होती. मुस्लीम दहशतवादाशी सुरू असलेले भारताचे युद्ध अद्याप संपलेले नाही, भारतात अन्यत्र कुठे काही खूप गंभीर, मोठे स्फोट होऊ शकले नसले, भारतीय सुरक्षा यंत्रणांनी त्यांना रोखले असले, तरी हा वडवानल शमलेला नाही याची साक्ष म्हणजे जम्मू-काश्मीरमधील या सगळ्या घटना होत्या.

दहशतवादी कारवाया दरवेळी देशाबाहेरून येऊनच केल्या जातील, असे नाही. त्यासाठी इथल्याच माणसांचा पद्धतशीर उपयोग केला जातो, हे यापूर्वी सिद्ध झाले आहे. देशात त्या दृष्टीने सतत धरपकड सुरू असते. वेगवेगळे छोटेमोठे कट, कटाची तयारी, निरोपांची देवाणघेवाण, घातपाती कारवायांच्या योजना सुरक्षा यंत्रणांकडून उघड होत असतात. शहरी-ग्रामीण भागातून तरुणांना ताब्यात घेतले जात असते. त्यामुळे, हा कर्करोग देशात सर्वत्र पसरला असल्याची जाणीव सुरक्षा यंत्रणांना आहे. त्यानुसार ते दक्षही आहेत. तरीही दिल्लीसारख्या घटना घडतात. अशा घटना घडल्या, की सुरक्षा यंत्रणांना; पर्यायाने सरकारला दोष दिला जातो. पण, दक्षतेला मर्यादा असतात. कोणतीही प्रतिबंधात्मक यंत्रणा जगात कुठेही, कधीही पूर्णपणे सुरक्षित, खात्रीशीर हमीची असू शकत नाही, यावर तज्ज्ञांचे एकमत आहे. दुसरे, दहशतवादाविरुद्धचा लढा केवळ सैन्याने, सुरक्षा यंत्रणांनी लढायचा नसतो. अशा यंत्रणा त्याला कधीच पुऱ्या पडू शकत नाहीत. हा लढा सतर्कतेने, सावधानतेने, सामाजिक ऐक्याने लढायचा असतो. त्याची जबाबदारी बरीचशी नागरिकांवरच असते. दहशतवादाचे संकट नागरिकांनी किती समजावून घेतले आहे, त्याच्या कारणांना पुष्टी मिळणार नाही, असे सामाजिक सौहार्द्र किती आहे, 'नागरिक' म्हणून असलेल्या आपल्या कर्तव्यांना शालेय शिक्षणातून किती बिंबवले जात आहे, यावर या लढ्याचे यश बहुतांश अवलंबून असते. दिल्ली बॉम्बस्फोटामागे डॉक्टरांची मोठी साखळी असल्याचे उघड झाले आहे.

### टी.सी.हरवला आहे

मी श्री.गणेश मोहन लहाने, रा.बागझरी, ता.अंबाजोगाई येथील रहिवासी असुन दि.२१/११/२५ रोजी शैक्षणिक कामानिमित्त अंबाजोगाईला आलो असता दुपारी शहरात एका ठिकाणी नाष्टा केला असता, त्या ठिकाणाहून माझी मुळप्रतीतील टि.सी. व काही ईतर झेरॉक्स कागदपत्रांची पिशवी गहाळ झाली आहे.

कुणाला सापडल्यास कृपया या मो.नं. ९१४६२५६११४ वरती संपर्क करावा ही विनंती....!

# जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षकांचा गुंडगिरी करणाऱ्या शुभम करडुलेला दणका !

बीड /प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील सार्वजनिक सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत यांनी जिल्हयाची धुरा सांभाळल्या पासुन शर्थीचे प्रयत्न चालवले आहेत. त्यांना बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी मा. श्री. विवेक जॉन्सन यांची खंबीर साथ लाभली आहे. बीड जिल्ह्यातील गुंडगिरीचे व गुन्हेगारीचे तसेच वाळु माफीयांचे समुळ उच्चाटन करण्याचा उदात्त दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवुन चझऊ- कायद्या अंतर्गत बऱ्याच गुन्हेगारांवर व गुंडावर कार्यवाही करण्याचे योजिले आहे. त्या अनुषधांने पोनि पो.स्टे. आष्टी यांनी इसम नामे शुभम बाळासाहेब करडुले वय २५ वर्षे रा. शिराळ ता. आष्टी जि.बीड याचे विरुद्ध चझऊ- कायद्याअंतर्गत स्थानबद्ध करण्याबाबतचा प्रस्ताव पोलीस अधीक्षक बीड यांच्या मार्फतीने मा. जिल्हादंडाधिकारी साहेब बीड यांना सादर केला होता.

सदर स्थानबध्द इसमाविरुध्द पो. ठा. आष्टी येथे गंभीर दुखापत करणे, अवैध वाळू वाहतुक व साठा करणे, अशा गंभीर स्वरुपाच्या गुन्ह्याची नोंद पोलीस अभिलेखावर आहे. सदरील इसम हा गंभीर स्वरुपाचे गुन्हे करण्याच्या सवईचा असल्याने आष्टी पोलीसांची त्याचेवर बऱ्याच दिवसांपासुन करडी नजर होती. तसेच सदर इसमाने आपले वर्तन सुधारावे म्हणुन यापुर्वी त्याचेवर प्रतिबंधक कारवाई करण्यात आली होती. परंतु सदर इसम हा प्रतिबंधक कारवाईस न जुमानता पुन्हा चढत्या क्रमाने गंभीर गुन्हे करण्याचे चालुच ठेवून होता. त्याची आष्टी तालुक्याच्या परीसरात प्रचंड दहशत आहे. त्यांचे विरुध्द सर्व सामान्य लोक फिर्याद अथवा साक्ष देण्यास समोर येत नाहीत. तो




सर्वसामान्य लोकांना व व्यापाऱ्यांना त्रास देवुन दहशत निर्माण करुन गुन्हे करत होता.सदर प्रकरणात श्री. विवेक जॉन्सन जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी बीड यांनी दिनांक २४.११.२०२५ रोजी सदर प्रकरणाच्या अनुषंगाने एम.पी.डी.ए. कायद्याअंतर्गत आदेश पारीत करून बीड जिल्ह्यातील सार्वजनिक सुव्यवस्था अबाधीत राहावी हा उदात्त दृष्टीकोन डोळयासमोर ठेऊन सदर इसमास तात्काळ ताब्यात घेवून हर्सल कारागृह छत्रपती संभाजीनगर येथे हजर करून स्थानबध्द करणे बाबत आदेश पारीत केले होते. त्यानंतर पोलीस अधिक्षक बीड यांनी सदर इसमास तात्काळ ताब्यात घेवून कार्यवाही करण्याच्या सुचना पोनि आष्टी व पो.नि. स्थागुशा बीड यांना दिल्या होत्या. सदर आदेशावरुन पो.नि. स्थागुशा यांनी ताबे पोलीस अंमलदार यांचे मार्फत सदर इसमास दिनांक २४.११.२०२५ रोजी १८.३० वाजता त्याच्या राहते घरातुन कायदेशीररीत्या ताब्यात घेऊन योग्य पोलीस बंदोबस्तात हर्सुल कारागृह, छत्रपती संभाजीनगर येथे दि. २५.०११.२०२५ रोजी ०२.५० वाजता हजर करुन स्थानबध्द केले आहे.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत, अपोअ अंबाजोगाई श्री. सचिन पांडकर, यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि.श्री शिवाजी बंटेवाड स्थागुशा बीड, पो.नि. शरद भुतेकर व पोस्टे आष्टी येथील अधिकारी व अंमलदार, तसेच स्थागुशा येथील पोह/१६०९ दुबाले, १३०२ गायकवाड, २०२९ सानप, पोअ २२१० सय्यद, २२१५ परजने यांचेसह, सपोउपनि अभिमन्यु औताडे, नेमणुक वाचक/स्थागुशा बीड यांनी केलेली आहे. भविष्यातही वाळुचा चोरटा व्यापार करणारे, अवैध गुटका विक्री करणारे तसेच जिवनावश्यक वस्तुंचा काळाबाजार करणारे व्यक्ती व जातीय तथा धार्मीक तेढ निर्माण करणारे समाजकंठक यांचेवर व दादागिरी करणाऱ्या व खंडणी बहाद्दर धोकादायक गुंडावर जास्तीत जास्त चझऊ- कायदयाअंतर्गत कठोर कारवाई करण्याचे संकेत पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत यांनी दिले आहेत.

पान १ वरून...

**नंदू काका हाच ....**

आंबेजोगाईकरांना प्रत्येक निवडणुकीत नावातच पापा असल्याने आश्वासनाच्या रूपात मोठमोठ्या थापा मारण्याचे काम मात्र पापा मोदींनी चोख बजावले आहे. म्हणून आता एक कर्तव्यदक्ष नगराध्यक्ष किंवा पुढारी म्हणून नाही तर पापा म्हणजे केवळ थापा असे समीकरण आता शहरात सर्वत्र निर्माण झाले असून, अशा या फुशारक्या मारण्याच्या दगाबाज वृत्तीमुळे पापा मोदींचे कितीतरी निकटवर्तीय त्यांना यावेळी सोडून नंदकिशोर मुंदडा यांची कार्यकुशलता पाहून आणि दमदार आमदारांचे कामदार काम पाहून, अक्षय मुंदडा यांचे यथायोग्य नियोजन पाहून मुंदळा कुटुंबाच्या डे-यात दाखल झाले आहेत. सध्याच्या घडीला तरी एका बाजूने पापा मोदींच्या थापा, तर दुसऱ्या बाजूने नंदू काका आणि त्यांच्या एकंदरीत कामाचा ठेका पाहून आंबेजोगाईचा नगराध्यक्ष यावेळी बदलण्यासारखेच वातावरण आजमीतिला तरी दिसून येत आहे. परंतु राजकारण म्हटलं की त्यात असंख्य डावपेच आणि बारकावे आले. तेंव्हा शिल्लक राहिलेल्या दिवसांमध्ये अजूनही काहीही होऊ शकत असल्याने आजच कोणी ठामपणे निकाल सांगू शकत नाही. परंतु पापा मोदींचे सातत्याने केवळ आश्वासन देऊन त्याची पूर्तता न करणे हा स्वभाव पापा मोदीना नडतो की काय असेच सध्या तरी वातावरण वाटत आहे..!

# ना. अजितदादा पवार यांचे विकासाचे व्हिजन व्यापारी वर्गाला आशेचा किरण दाखवून गेले

## राष्ट्रवादी उमेदवारांच्या प्रचारार्थ व्यापारी बांधवांच्या मेळाव्यात केले महत्वपूर्ण मार्गदर्शन

बीड /प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष-शिवसेना-शिवसंग्राम आणि मित्रपक्षाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. प्रेमलता पारवे आणि ५२ नगरसेवक पदाचे उमेदवार यांच्या प्रचारार्थ बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. अजितदादा पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत बीड येथे झालेल्या व्यापारी बांधवांच्या मेळाव्यात ना. अजितदादांनी मांडलेले विकासाचे व्हिजन व्यापारी वर्गाला आशेचे किरण दाखवून गेले. बीड नगर परिषदेत गेल्या ३५ वर्षांपासून एकाच कुटूंबाची असलेली मक्तेदारीमुळे बीड जिल्ह्याच्या औद्योगिक विकासाला खिळ बसली. ना. अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली विकासाचे व्हिजन असलेले पॅनल नगर परिषदेत गेले तर बीड शहरात विकासाची सकाळ उगवेल अशी चर्चा व्यापारी वर्गात चर्चीली जात आहे.

बीड नगर परिषद निवडणुकीतील नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार प्रेमलता पारवे आणि शहरातील ५२ नगरसेवकांच्या प्रचारार्थ महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. अजितदादा पवार यांनी प्रचार दौरा केला. यावेळी त्यांनी व्यापारी बांधवांच्या मेळाव्यात मार्गदर्शन करून व्यापारी वर्गात ऊर्जा भरली. यावेळी बोलताना ते म्हणाले की, बीड शहराच्या भविष्याचा निर्णायक टप्पा नगर परिषदेच्या माध्यमातून आपल्या दारात उभा आहे. या निवडणुकीत लोकविकास महाआघाडीने नगराध्यक्षांसह ५३ उमेदवार उभे केले आहेत. ते अनुभवी आहेत, त्यांच्यात नवी उमेद आहे, ऊर्जा आहे. बीड शहर हे विविध जाती-धर्मांचे मनोमीलन असणारे शहर आहे. या शहराच्या प्रत्येक माणसाला सन्मानाने जगता आले पाहिजे. या भागाचा औद्योगिक विकास झाला पाहिजे ही पालकमंत्री म्हणून माझी जबाबदारी आहे. उखखखढ सारख्या प्रकल्पामुळे विकासाला नवी दिशा मिळत आहे. क्रीडा संकुलासाठी आर्थिक निधीची तरतुद करण्यात आली आहे.



स्वच्छतेकडे विशेष लक्ष दिले जाणार आहे. पिंपरीचिंचवड आणि बारामतीत कचरा व्यवस्थापन, आधुनिक प्लांटस्, चांगले अधिकारी जसे उपलब्ध करून दिले त्याच धर्तीवर बीड शहरात देखील या सुविधा उपलब्ध करून द्यायच्या आहेत. विमानतळासाठीची जागा, सायन्स पार्क, दर्जेदार रस्ते ही कामे सुरु आहेत, बीड ते अहिल्यानगर रेल्वेसेवेला पुण्यापर्यंत आणि त्यानंतर मुंबईपर्यंत न्यायचे आहे. बीड शहराचा कायापालट व्हावा म्हणून पुढची पाच वर्षे पूर्णपणे काम करण्याची संधी मिळणे आम्हाला गरजेचे आहे. शेतकरी, व्यापारी आणि सामान्य नागरीक यांचे प्रश्न सोडविण्यासाठी आम्ही कटिबध्द आहोत. बीडकरांना बारा महिने पाणी मिळावे, व्यापारी विविध सुविधा मिळाव्यात, एम.आय.डी.सी. चा विकास गतीने व्हावा, मुलभूत सुविधा दर्जेदार मिळाव्यात यासाठी काम चालू आहे अशा प्रकारचे मार्गदर्शन करून ना. अजितदादा पवार यांनी व्यापारी वर्गाला आशेचा किरण दाखवला असून व्यापाऱ्यांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे.

दरम्यान ना. अजितदादा पवार यांच्या प्रचार दौऱ्यामुळे बीड नगर परिषद निवडणुकीत कार्यकर्ते आणि मतदारांध्ये उत्साह संचारला आहे. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस आणि मित्रपक्षाचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार श्रीमती प्रेमलता पारवे यांच्यासह ५२ नगरसेवक पदाच्या उमेदवारांच्या विजयावर शिक्कामोर्तब झालेले आहे.

# विनय तोतलाने चार्टर्ड अकाउंटंट परीक्षेत मारली बाजी

बीड /प्रतिनिधी

ज्येष्ठ नेते जवाहरलाल सारडा यांचा नातू चिरंजीव विनय तोतला याने चार्टर्ड अकाउंटंट या परीक्षेत मेरिटमध्ये पास होऊन बाजी मारली आहे.

त्याने खूप मेहनतीने ही पदवी मिळवली आहे. तो अवघ्या २२ व्या वर्षीच चार्ट अकाउंट झालेला आहे. त्याने आत्तापर्यंत ज्या काही परीक्षा सीए होण्यासाठी त्या फर्स्ट मध्येच पास झालेला आहे. लहानपणा पासूनच तो अभ्यासात हुशार होता. म्हणून त्याने डिग्री पण सहजगत्या मिळवली आहे तो मनोजजी तोतला यांचा मुलगा आहे. त्यांचा एसटी पार्सलचा व्यवसाय आहे.तसेच त्याची आई सौ शीतल तोतला ही पण एम कॉम झालेली आहे. त्याने याच्या पुढचं शिक्षण घेण्याचे ठरवलेलं आहे त्यास पुढील कार्यासाठी दैनिक समर्थ राजयोग परिवाराच्या वतीने हार्दिक शुभेच्छा.



# देवदहिफळ येथे मल्हारी म्हाळसाकांत विवाह सोहळा संपन्न

## यात्रेत आज रंगणार कुस्त्यांची दंगल..!

दिंद्रुड : धारूर तालुक्यातील श्रीक्षेत्र देवदहिफळ येथे मल्हारी म्हाळसाकांत खंडेरायाची मोठी यात्रा भरते. याच पार्श्वभूमीवर बुधवारी पहाटे सुर्योदयापूर्वी खंडेरायाच्या लग्नाचा पारंपारिक सोहळा पार पडला. देवाच्या विवाह सोहळ्यास हजारो भाविक भक्तांनी उपस्थिती लावली. यात्रेत गुरुवारी कुस्त्यांची जंगी दंगल रंगणार असून पहिलवान व कुस्ती शौकीन मंडळींनी याचा लाभ घेण्याचे आवाहन यात्रा उत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

चंपाषष्ठी निमित्त सबंध महाराष्ट्रात ठिकठिकाणी खंडोबाची यात्रा भरते. देव दहिफळ येथे तब्बल दोन महिने ही यात्रा चालते. नागदिवे पूजन दिवशी दिंद्रुड व कानसुर येथील मानाची खंडोबा काटी तसेच,साळेगाव,पुसद आणि बाबळगाव येथील पालखी,नाकलगांव चे काकण देवदहिफळ येथे दाखल झाल्या. रात्री शोभेची दारू उडवण्यात आली. दि.२६ बुधवारी चंपाषष्ठीच्या पहाटे सुर्यदयापूर्वी खंडोबा देवाचे म्हाळसा देवी सोबत लग्न लावण्याचा कार्यक्रम संपन्न झाला. तत्पूर्वी महापूजा सौ.पुजा व किर्तीकुमार जगताप यांच्या हस्ते संपन्न झाली.हजारो भाविक भक्तांनी देवाच्या लग्नास उपस्थित राहून दर्शन घेतले.

यात्रेनिमित्त गुरुवारी कुस्त्यांची जंगी दंगलीचा कार्यक्रम होणार असल्याची माहिती श्री खंडोबा देवस्थान कमिटी कडून देण्यात आली. कुस्तीच्या दंगलीतील कुस्ती स्पर्धे मध्ये १० रुपया पासुन ते ५१०१ रुपयांची बक्षीस दिली जाणार आहेत. बीड जिल्हा व मराठवाड्यातील कुस्ती प्रेमींना कुस्तीच्या दंगलीस उपस्थित राहण्याचे आवाहन देवदहिफळचे सरपंच श्रीधर बडे यांनी केले आहे. सरपंच श्रीधर बडे,माजी जि.प.सदस्य विलासराव बडे, श्रीहरी बडे, शिवाजीराव बडे, दिलीप बडे, विकास बडे,राज बडे, सुग्रीव बडे, रमेश बडे, दामोधर बडे, मुरलीधर बडे, नवनाथ बडे, विष्णुपंत बडे, राजेभाऊ



बडे, गोपाळराव बडे, बबन कांदे, अंगद वड्डे, शेख तायेर, सुभाष कांबळे,राम आंधळे,बाळकिसन आंधळे, विष्णू राख,नय्युम शेख,बाळू तोंडे, अंगद बडे, खंडू सहजराव, दामूआन्ना बडे, रामराव बडे, बाबासाहेब बडे, बाबुराव बडे,नामदेव जाधव,राधाकिसन बडे, उत्तम कांदे,वसंत तोंडे,पुजारी किर्तीकुमार जगताप यांच्या सह गावकऱ्याच्या वतीने करण्यात आले आहे.

# गेवराई शहराच्या शाश्वत विकासासाठी आशिर्वाद द्या - सौ. गिताभाभी पवार

## गेवराईत भाजपच्या सुसाट प्रचारलाटेत राष्ट्रवादी बेजार

गेवराई (प्रतिनिधी) गेवराई नगरपरिषद निवडणुकीत प्रचाराचा माहोल एका नव्या उंचीवर पोहोचला असून भाजपच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. गीताभाभी त्रिंबक (बाळराजे) पवार यांच्या दमदार प्रचार मोहीमेने शहरात चांगलीच चर्चा रंगली आहे. गेल्या वीस वर्षांपासून पवार परिवाराने गेवराई शहराला कुटुंबाप्रमाणे जपत प्रत्येक प्रभागात विकासा कामे करत शहराचा चेहरामोहरा बदलला असून येणाऱ्या काळातही शहराच्या शाश्वत विकासासाठी मला आशिर्वाद द्या असे आवाहन त्यांनी प्रचार फेरी दरम्यान केले.

सौ. गिताभाभी पवार यांनी मतदारांशी संवाद साधताना म्हटले की, गेल्या दोन दशकांपासून गेवराईकरांनी आमच्यावर ठेवलेल्या विश्वासामुळेच शहराचा सर्वांगीण विकास साधता आला. हा विकास प्रवास इथवर थांबणार नाही. पुढील पाच वर्षे हे शहर शाश्वत विकासाच्या नवनव्या अध्यायाकडे नेण्यासाठी आम्हाला तुमचा मतदानरुपी



आशिर्वाद अत्यंत महत्त्वाचा आहे. शहरातील विविध प्रभागांत दररोज काढल्या जाणाऱ्या प्रचार रॅली, पदयात्रा व कॉर्नर बैठकींना महिलांपासून युवक, ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वच मतदारांचा अत्यंत उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. प्रचार फेरीदरम्यान झालेल्या संवादात अनेक नागरिकांनी पवार परिवाराने दिलेल्या कामांची यादी देत या वेळीदेखील भाजपला संधी देण्याचा निर्धार व्यक्त केला. शहराच्या सर्वसमावेशक विकासासाठी फक्त नगराध्यक्षच नव्हे तर सर्व २२ प्रभागांत सक्षम लोकप्रतिनिधी आवश्यक आहेत. म्हणून भाजपच्या सर्वच्या सर्व उमेदवारांना एकजुटीने, प्रचंड बहुमताने विजयी करून गेवराई शहराची विकासगाथा अधिक वेगाने पुढे नेत राहू.

विशेष म्हणजे, शहरात भाजपच्या प्रचाराचा वेग एवढा वाढला आहे की, राष्ट्रवादी काँग्रेस गट पूर्णपणे हतबल झाल्याचे जाणवत आहे.

शाश्वत विकासाची नवी दिशा

पाणीपुरवठा, रस्ते, बाजारपेठांचा विकास, कचरा व्यवस्थापन, डिजिटल प्रशासन, महिला सक्षमीकरण यांसह अनेक नवनवीन प्रकल्पांची घोषणा करत त्यांनी भविष्यातील नवीन गेवराई ची रूपरेषा मतदारांसमोर मांडली. यावर जनतेचा मिळणारा सकारात्मक प्रतिसाद पाहता, आगामी निवडणुकीत भाजपच्या बाजूने एकतर्फी वातावरण तयार होत असल्याचे दिसून येत आहे.

# काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या उपस्थितीत झाला बीड नगरपालिका प्रचाराचा शुभारंभ

## बीड शहराला भकास करणाऱ्या कर्तव्यशुन्य लोकांना संधी न देता विकासासाठी काँग्रेसच्या हाताला मतदान करा – अशोकराव पाटील

बीड /प्रतिनिधी

बीड शहर आणि जिल्हा हा पुरोगामी विचारांचा आहे. काँग्रेसची विचारधारा येथे रुजलेली असल्यामुळे काँग्रेस पक्षाने या ठिकाणी नगराध्यक्ष सह सर्व जागेवर समविचारी पक्षांना सोबत घेऊन स्वबळावर निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला. या निवडणुकीत सामान्य कार्यकर्त्यांना आणि सर्वसामान्य जनतेला न्याय देणाऱ्या काँग्रेस पक्षाला आणि पक्षाच्या पंजा या चिन्हाला मतदारांनी साथ देऊन बीड नगरपालिकेमध्ये क्रांती घडवत काँग्रेसच्या पाठीशी ताकद उभी करावी असे आवाहन काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी बीड नगरपालिकेच्या शुभारंभ प्रसंगी केले. यावेळी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते माजी मंत्री अशोकराव पाटील यांची विशेष उपस्थिती होती.

बीड नगरपालिकेची रणधुमाळी सुरू असुन यंदा काँग्रेस स्वबळावर निवडणूक लढवत आहे. काँग्रेस पक्षाच्या वतीने नगराध्यक्ष पदासाठी करूणा मिलिंद मस्के व नगरसेवक पदासाठी काँग्रेस पक्षाकडून अधिकृत ३० जागांवर व उर्वरित जागांवर स्थानिक आघाडी पुरस्कृत करून काँग्रेस पक्ष यंदा स्वबळाचा नारा देत निवडणुकीच्या मैदानात उतरली आहे. मागील जवळपास वीस वर्षांपासून काँग्रेस याठिकाणी लढलेली दिसत नाही. त्यामुळे काँग्रेसचे अस्तित्व कुठे आहे असे वारंवार विरोधक बोलत असताना काँग्रेसचे माजी मंत्री अशोकराव पाटील व जिल्हाध्यक्ष राहुल भैया सोनवणे यांनी कार्यकर्त्यांच्या आग्रहास्तव जिल्ह्यात काँग्रेस स्वबळावर लढवून काँग्रेसचे अस्तित्व असल्याचे दाखवून दिले. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ व



माजी मंत्री अशोकराव पाटील यांच्या उपस्थितीत शहरात काँग्रेस पक्षाच्या उमेदवारांच्या प्रचाराचे नारळ फोडत जातीवादी धर्मांद व शहराला भकास करणाऱ्यांना मतदान न कारता काँग्रेस पक्षाच्या उमेदवारांना मतदान करून विजयी करण्याचे आवाहन केले.

काँग्रेस पक्षाने सर्व जातीधर्माला संधी देत सुशिक्षित चांगले उमेदवार दिले आहेत. काँग्रेस एक विचार असुन ते कधीही संपत नसते हे निदर्शनास आणुन दिले. त्याच बरोबर ज्येष्ठ नेत्या सुशीलाताई मोराळे, राजेंद्र सानप, माजी नगरसेवक अमर शेख आदींनी शहरात काँग्रेसच्या सर्व उमेदवारांना बिनशर्त पाठिंबा देत बीडकरांनी काँग्रेसच्या उमेदवारांना निवडून देण्याचे आवाहन केले. यावेळी युवानेते आदित्य पाटील, जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे, तालुकाध्यक्ष गणेश बजगुडे पाटील, शहराध्यक्ष परवेज कुरेशी, नगराध्यक्ष पदाचे उमेदवार सौ करूणा मस्के, गणेश राऊत, नवनाथ थोटे यांच्यासह काँग्रेस पक्षाचे सर्व पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बीड जिल्ह्यामध्ये काँग्रेसला ताकद देण्याचे काम खऱ्या अर्थाने माजी मंत्री अशोकराव पाटील आणि खासदार रजनीताई पाटील यांनी केले आहे. त्यामुळेच आम्ही बीडमध्ये स्वबळावर निवडणूक लढवण्याचे धाडस या नेत्यांच्या पाठबळामुळेच केले आहे. मतदार देखील आम्हाला निश्चित विजय साथ देतील असा विश्वास काँग्रेसचे गणेशराव बजगुडे यांनी यावेळी व्यक्त केला.

---

## तहसील कार्यालय, कळंब

.जा.क्र. २०२५ / मह/ दंडणीय/कावी–
दिनांक २८/०८/२०२५

### जाहिर प्रगटन

समस्त गावकरी **शिराढोण ता कळंब जि. धाराशिव** यांना कळविण्यात येते की, या **कार्यालयात ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, शिराढोण** यांचेमार्फत **श्री साजिद जमील अहमद फारोकी रा. शिराढोण, ता.कळंब जि. धाराशिव** यांनी त्यांचे स्वतःचे जन्म प्रमाणपत्र मिळणेबाबत विनंती केली आहे.

**प्रमाणपत्र धारकाचे गांव मौजे शिराढोण ता.कळंब हे असुन सदर व्यक्तीचा जन्म मौजे शिराढोण, ता.कळंब जि.धाराशिव या ठिकाणी दि. ०४/०९/१९७८** रोजी जन्म झाला असून जन्म प्रमाणपत्र मिळणेसंबंधी सदरील कार्यालयात ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, शिराढोण यांनी दि. ३१/०७/२०२५ रोजी आपल्या अभिप्रायासह व आवश्यक कागदपत्रांसह अहवाल सादर केला आहे.

वरील जन्म बाबत कोणाचा बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या कार्यालयास सादर करावा, आक्षेप मुदतीनंतरच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरित/–**
**कार्यकारी दंडाधिकारी,**
**कळंब**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि–१५०५ दि.०२.११.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **अमजद शेख हाजी रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **आजी** च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | मृत्यू दिनांक |
|---|---|---|---|
| १ | मासुमबी शेख मिकन | आजी | २२.०९.२०१९ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक– ०२/११/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/–**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

## तहसील कार्यालय, कळंब

.जा.क्र. २०२५ / मह/ दंडणीय/कावी–
दिनांक २८/०८/२०२५

### जाहिर प्रगटन

समस्त गावकरी **शिराढोण ता कळंब जि. धाराशिव** यांना कळविण्यात येते की, या **कार्यालयात ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, शिराढोण** यांचेमार्फत **श्री मुमताज मन्सुर दखनी रा. शिराढोण, ता.कळंब जि. धाराशिव** यांनी त्यांचे स्वतःचे जन्म प्रमाणपत्र मिळणेबाबत विनंती केली आहे.

**प्रमाणपत्र धारकाचे गांव मौजे शिराढोण ता.कळंब हे असुन सदर व्यक्तीचा जन्म मौजे शिराढोण, ता.कळंब जि.धाराशिव या ठिकाणी दि. २०/०६/१९७८** रोजी जन्म झाला असून जन्म प्रमाणपत्र मिळणेसंबंधी सदरील कार्यालयात ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, शिराढोण यांनी दि. ३१/०७/२०२५ रोजी आपल्या अभिप्रायासह व आवश्यक कागदपत्रांसह अहवाल सादर केला आहे.

वरील जन्म बाबत कोणाचा बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या कार्यालयास सादर करावा, आक्षेप मुदतीनंतरच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरित/–**
**कार्यकारी दंडाधिकारी,**
**कळंब**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि–९४६ दि.१९.११.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **जिजासाहेब बाबासाहेब काळवणे, रा.ठाकुरवाडी ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | रोहित जिजासाहेब काळवणे | मुलगा | २७.१२.२००९ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक– –/–/– रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/–**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि–१३९१ दि.२६.११.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **पांडुरंग हरिचंद्र शेळके, रा.आलमगाव ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | करण पांडुरंग शेळके | मुलगा | १४.१०.२०१० |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक– २६/११/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/–**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई जि.बीड येथील २ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री एच.एम.मोमीन यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.९५४/२०२५**
रूक्मीणबाई भ्र.माणिकराव मराठे व इतर
**(मार्फत–ॲड.नाकाडे एस.बी.गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे **रूक्मिणबाई तुकाराम सानप, रा.अर्धमसला, ता.गेवराई जि.बीड हे दि.१८.११.२०२० रोजी सदर ठिकाणी** येथे मयत झाले/झाल्या आहेत.

अर्जदार **१. तुकाराम पि.केशवराव सानप, वय–८० वर्षे, धंदा–सेवानिवृत्ती शिक्षक, रा.अर्धमसला, ता.गेवराई जि.बीड, २. दिलीप पि.तुकाराम सानप, वय–५४ वर्षे, धंदा–सरकारी नौकर, रा.सदर, ३.संदिप पि.तुकाराम सानप, वय–४८ वर्षे, धंदा–सदर, रा.सदर**यांनी सदरहु मयताच्या नावे खालीलप्रमाणे रक्कम जमा आहे.

| अ.क्र. | बँकेचे नाव / कंपनीचे नाव /पतसंस्थेचे नाव | क्रमांक बचत खाते क्र. | रूपये पै. |
|---|---|---|---|
| १ | बँक ऑफ महाराष्ट्र शाखा गढी ता.गेवराई जि.बीड | २५०३९०४४५०७ | रु.५४, १९४.४२/– अक्षरी चोपन हजार एकशे चौऱ्यान्नव रूपये आणि बेचाळीस पैसे |

वरील रक्कम मिळणे कामी अर्जदार यांना उत्तराशिकार प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता भारतीय वारसा कायदा कलम ३७२ प्रमाणे उत्तराधिकार प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर **रूक्मिणबाई तुकाराम सानप** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दि.२०/११/२०२५** रोजी माझ्या स्वाक्षरिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**पुढील तारिख –०२/०१/२०२६**

स्वाक्षरित/– **कनिष्ठ लिपीक** दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई
**शिक्का**
आदेशावरून स्वाक्षरित/– **सहाय्यक अधिक्षक** दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

---

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई जि.बीड येथील २ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री एच.एम.मोमीन यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.९५७/२०२५**
किशोर नंदकुमार पंडित व इतर वि.निरंक
**(मार्फत–ॲड.बांगर ए.बी.गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे **लताबाई भ्र.नंदकुमार पंडित, रा.दैठण, ता.गेवराई जि.बीड हे दि.०२.०८.२०२३ रोजी रा.दैठण ता.गेवराई जि.बीड** येथे मयत झाले/झाल्या आहेत.

अर्जदार **१. किशोर नंदकुमार पंडित, वय–५० वर्षे, धंदा–शेती, रा.दैठण ता.गेवराई जि.बीड, २. बाळु पि.नंदकुमार पंडित, वय–३८ वर्षे, धंदा–शेती, रा.सदर** यांना शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर **लताबाई भ्र.नंदकुमार पंडित** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दि.२०/११/२०२५** रोजी माझ्या स्वाक्षरिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**पुढील तारिख –०२/०१/२०२६**

स्वाक्षरित/– **कनिष्ठ लिपीक** दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई
**शिक्का**
आदेशावरून स्वाक्षरित/– **सहाय्यक अधिक्षक** दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

---

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई जि.बीड येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री रविंद्र अ.मिसाळ यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.९५८/२०२५**
बाबासाहेब बाजीराव शेरे विरूध्द निरंक
**(मार्फत–ॲड.पी.बी.घारगे, गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे **बाजीराव पि.दगडु शेरे हे दि.०६.०८.२०२० रोजी रा.रांजणी ता.गेवराई जि.बीड** येथे मयत झाले/झाल्या आहेत.

अर्जदार **१.बाबासाहेब पि.बाजीराव शेरे, वय–४१ वर्षे, धंदा–शेती, रा.रांजणी ता.गेवराई जि.बीड, २.मंडाबाई भ्र.बाजीराव शेरे, वय–७८ वर्षे, धंदा–घरकाम, रा.सदर, ३. लताबाई भ्र.विठ्ठल शिंदे वय–५० वर्षे, धंदा–शेती, रा.कामखेडा ता.जि.बीड** यांना शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर **लताबाई भ्र.नंदकुमार पंडित** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दि.२०/११/२०२५** रोजी माझ्या स्वाक्षरिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**पुढील तारिख –०१/०१/२०२६**

स्वाक्षरित/– **कनिष्ठ लिपीक** दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई
**शिक्का**
आदेशावरून स्वाक्षरित/– **सहाय्यक अधिक्षक** दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

---

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई जि.बीड येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री रविंद्र अ.मिसाळ यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.९५५/२०२५**
शुभम संतराम कारवाळ विरूध्द निरंक
**(मार्फत–ॲड.ढोबळे एस.एस.गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे **संतराम पि.तुळशीराम कारवाळ हे दि.२१.०८.२०२४ रोजी रा.लोणी ब क राहता ता.राहता जि.अहमदन** येथे मयत झाले/झाल्या आहेत.

अर्जदार **१.शुभम संतराम कारवाळ, वय–३० वर्षे, धंदा–शेती, रा.मुधापुरी ता.गेवराई जि.बीड ह.मु.दुर्गानगरी, सुतगिरणी रोड, भैरोनगर, श्रीरामपुर ता.श्रीरामपुर जि.अहमदनगर, २. मिरा भ्र.संतराम कारवाळ वय–५२ वर्षे, धंदा–शेती, रा.सदर, ३. प्रियंका भ्र.नारायण मोरवाळ, वय–२८ वर्षे, धंदा–घरकाम, रा.भारत नगर, गारखेडा परिसरा छत्रपती संभाजीनगर, ता.जि.छत्रपती संभाजीनगर** यांना शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर **संतराम पि.तुळशीराम कारवाळ** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दि.२०/११/२०२५** रोजी माझ्या स्वाक्षरिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**पुढील तारिख –२४/१२/२०२५**

स्वाक्षरित/– **कनिष्ठ लिपीक** दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई
**शिक्का**
आदेशावरून स्वाक्षरित/– **सहाय्यक अधिक्षक** दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

# पापा मोदींनी व्यवहारेंना टाळून केलेला व्यवहारच त्यांची हार करणार....?

(अंबाजोगाई/प्रतिनिधी)

सौ. संगीता सुनील व्यवहारे या आंबेजोगाई शहरातील राजकारणामध्ये माजी नगराध्यक्ष रचना मोदी यांच्या अतिशय जवळच्या मैत्रीण तर राजकिशोर पापा मोदी यांच्या अत्यंत निकटवर्तीय कार्यकर्ते असलेल्या सुनील व्यवहारे यांच्या सुविद्य पत्नी होय.

एकाद्या शहरामध्ये एखाद कुटुंब किंवा एखाद दांपत्य किंवा एखाद पुरुष-महिला व्यक्तिमत्व अत्यंत सज्जन-संयमी-शांत आणि सामाजिक दायित्व जपणार असत. त्यातलच आंबेजोगाई तथा अंबानगरीतील एक उदाहरण म्हणजे व्यवहारे कुटुंब....! एक अतिशय साधा-सरळ कमालीचा शांत आणि प्रमाणिक कार्यकर्ता, युवा नेता व क्रियाशील नगरसेवक प्रतिनिधी म्हणून सुनिल व्यवहारे यांची संपूर्ण अंबाजोगाई शहरातील ओळख. अगदी हुबेहूब याच स्वभावाच्या कमालीच्या प्रेमळ, शिवाय प्रत्येक सामाजिक-धार्मिक-अध्यात्मिक आणि महिलाविषयक प्रश्ना संबंधित कार्यात हिरारीने सहभागी होऊन प्रत्येक कार्यात आपली चुणूक दर्शवून अंबाजोगाई शहरातील महिला वर्गात तर प्रचंड लोकप्रिय. परंतु समाजात सुद्धा स्वतःची एक वेगळी ओळख स्वकृतत्वावर निर्माण केलेल्या सौ. संगीता सुनील व्यवहारे (वहिनी) यांना तर स्वपक्षीय सोडा परपक्षीय सुद्धा नाव ठेवू शकत नाहीत. आणि मग राहिले कुटुंबाचे. तर व्यवहारे कुटुंबाकडून कुणालाच कधी काडीचा त्रास नाही. अशा लोकप्रिय आणि अत्यंत सामान्य साध्या कुटुंबातील संगीता व्यवहारे या गतवेळी नगरसेवक असताना सुद्धा आणि पापा मोदींच्या गटातील एकूण नगरसेवकांमध्ये अत्यंत क्रियाशील-कार्यतत्पर क्रमांक एकवर असलेल्या व्यवहारे दांपत्यास



नगरपरिषद निवडणुकीच्या रिंगणातून चक्क बाजूला सारण्याचे षडयंत्र पापा मोदी यांनी कोणाच्या सांगण्यावरून केले...? कशासाठी केले....??.... आणि का केले....??? हे न ओळखण्या इतपतची मायबाप जनता या सुजाण आंबेजोगाईत तरी अज्ञानी नाही. त्यातल्या त्यात प्रभाग क्रमांक सहा (६) मधील मतदार मायबाप तथा सुजाण नागरिक तर अतिशय सुज्ञ आहेत.

एका बाजूने राजकारणात अतिशय गुन्हेगारीवृत्तीचे, भ्रष्टाचारी, कलंकित आणि स्वतःची उखळं पांढरी करणारी नगरसेवक मंडळी नगरसेवक म्हणून मिरवत असताना कुठेतरी आंबेजोगाई सारख्या सुसंस्कृत शहरांमध्ये व्यवहारे कुटुंबाच्या माध्यमातून एक सुसंस्कृत-सुजाण-सोज्वळ-शांत-संयमी-सुस्वाभावी नगरसेवक मिळालेला असताना, विशेष करून जनतेला अशा प्रकारचेच महिला किंवा पुरुष नगरसेवक नगरपालिकेत पाहिजे असताना अशाच व्यक्तिमत्वास ऐनवेळी पाठीत खंजीर खुपसून बाजूला सारून पापा मोदींनी काय साध्य केलंय हे त्यांनाच ठाऊक....? परंतु मायबाप जनता आणि मतदार मात्र या संधीचे सोने करून पापा मोदींना धडा शिकवून केवळ सौ. संगीता सुनील व्यवहारे यांना नगरसेवक म्हणून विजयी करून थांबणार नाहीत. तर पापा मोदींसारख्या आर्थिक व्यवहार करून केवळ व्यवहारापोटी व्यवहारे सारख्या सृजनशील नगरसेवकाला राजकारणातून हद्दपार करणार पाहू असतील तर व्यवहारें प्रतीच्या प्रेमापोटी व डावल्याच्या रागापोटी शिवाय शहरातील पाणी प्रश्नाच्या निष्काळजीपणापोटी पापा मोदींनाच राजकारणातून हद्दपार केल्याशिवाय जनता राहणार नाही असे आमच्या प्रतिनिधीशी बोलताना प्रभाग क्रमांक - ६ सह ईतरही प्रभागातील अनेक नागरिकांनी नाव न छापण्याच्या अटीवर आपली प्रतिक्रिया व्यक्त केली. तेंव्हा प्रत्येक ठिकाणी व्यवहारालाच महत्व देणाऱ्या पापा मोदी सारख्या व्यवहारिक नेत्याला जनता नक्कीच धडा शिकवणार असे चित्र सध्या दिसून येत आहे. तेंव्हा जनता नेमके काय करणार हे पाहणे आता औत्सुक्याचे ठरेल.....!

# कांताबाई पोखरकर प्रचारात आघाडीवर, मतदारांचा विश्वास मिळवणारा चेहरा म्हणून मिळणार संधी

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

अंबाजोगाई नगर परिषद निवडणुक चांगलीच रंगत असताना प्रभाग क्रमांक ०४ खडकपुरा मध्ये शहर परिवर्तन जनविकास आघाडीच्या अधिकृत उमेदवार सौ. कांताबाई सिद्राम पोखरकर यांना या भागातील मतदाराकडून मोठ्या प्रमाणावर पाठिंबा मिळत असून प्रभागात विनोद पोखरकर यांनी सातत्याने केलेल्या सामाजिक कार्याची जोरदार चर्चा सुरू आहे. समाजकार्यातून आणि विकास उपक्रमांतून निर्माण झालेली विनोद याची ओळख मतदारांच्या मनात भक्कमपणे रूजली असून विजयाचा गुलाल कांताबाई पोखरकर यांच्या रूपानेच उधळला जाणार अशा चर्चा प्रभागात रंगू लागल्या आहेत.

सौ.कांताबाई पोखरकर यांच्या मागे सामाजिक परंपरा अध्यात्मिक अधिष्ठान व अनुभवाचा मजबूत पाया आहे. सासरी व माहेरी सामाजिक, अध्यात्मिक क्षेत्रात केलेल्या कामाचा प्रभाव अद्यापही मतदारांवर आहे.विनोद पोखरकर व परिवाराची जनसंपर्काची परंपरा, सातत्याने लोकांमध्ये मिसळून समस्या सोडवण्याची वृत्ती आणि नागरिकांच्या प्रश्नांवर वेळोवेळी घेतलेली पुढाकार यामुळे मतदारांमध्ये त्यांच्या मातोश्री बद्दल सकारात्मक लाट दिसत आहे. प्रभागातील दैनंदिन समस्या, पायाभूत सुविधा,रस्ते, पाणीपुरवठा,



स्वच्छता यांसारख्या मुद्यांवर ठोस काम करण्याची भूमिका सौ.कांताबाई पोखरकर व विनोद पोखरकर यांनी नागरिकांसमोर मांडली आहे. विकासाचे व्हिजन घेऊन प्रभागात कामे उभी करणे,

सामान्य नागरिकांचे प्रश्न प्राधान्याने सोडवणे आणि पारदर्शक कारभार ठेवणे हे माझे उद्दिष्ट आहे, असे कांताबाई पोखरकर, हनुमंत तौर यांनी सांगितले. प्रचारादरम्यान मतदारांशी संवाद साधताना त्यांनी आम्हाला मतदान करून प्रचंड बहुमताने विजय मिळवून देण्याचे आवाहन केले आहे. वार्डातील तरुण, ज्येष्ठ नागरिक, महिला वर्ग तसेच विविध समाजातील लोकांकडून मिळणारा सहभाग पाहता प्रभाग क्र. ०४ खडकपुरा मध्ये सौ. कांताबाई पोखरकर, हनुमंत तौर यांची बाजू अधिकाधिक मजबूत होताना दिसत आहे. जनतेचा विश्वास, सातत्याने केलेले सामाजिक उपक्रम आणि घराघरात पोहोचलेली प्रभावी छाप या सर्व कारणांमुळे या प्रभागात कांताबाई पोखरकर यांच्या विजयाची शक्यता

# स्थानिक गुन्हे शाखेने गावठी पिस्टल बाळगणारा ईसम पकडला

बीड /प्रतिनिधी

स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणुक असल्याने आदर्श आचारसंहीता लागु झालेली असुन त्या अनुषंगाने मा. पोलीस अधीक्षक बीड यांनी अवैध अग्निशस्त्र बाळगणाऱ्या इसमांची गोपनिय माहीती काढून कारवाई करण्याचे आदेशीत केले होते.

दिनांक २५.११.२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे प्रभारी अधिकारी श्री शिवाजी बंटेवाड यांना गोपनिय बातमीदारामार्फत माहीती मिळाली की, ईसमनामे विशाल मरकस मस्के रा सौताडा हा सौताडा येथील एका हॉटेल समोर कंबरेला पिस्टल लावुन कोणाची तरी वाट पाहत थांबलेला आहे अशी माहीती मिळताच स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने तात्काळ सदरील ठिकाणी जावुन सापळा रचुन आरोपी विशाल यास पकडले. त्याची अंगझडती घेतली असता त्याचे पॅन्टच्या आतमध्ये कंबरेला गावठी पिस्टल लावलेले मिळून आले. सदरील पिस्टल जप्त करुन आरोपीविरुध्द पोलीस ठाणे पाटोदा गु.र.नं ३८३/२०२५ कलम ३/२५ आर्म अॅक्ट प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरील कामगिरी हि श्री नवनित काँवत, पोलीस अधीक्षक, बीड, श्री सचिन पांडकर, अपर पोलीस अधीक्षक बीड, श्री शिवाजी बंटेवाड, स्थानिक गुन्हे शाखा, बीड यांचे



मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक धनराज जारवाल, पोलीस हवालदार बाळु सानप, अशोक दुबाले, सोमनाथ गायकवाड, आनंद मस्के, विकी सुरवसे, चालक पोलीस अंमलदार सिध्देश्वर मांजरे सर्व नेमणुक स्थानिक गुन्हे शाखा बीड यांनी केली आहे.

# साखर कारखानदारांच्या मनात पाप नसेल तर सर्वांनीच लेखी परिपत्रक काढुन ऊस दर जाहीर करावा - भाई मोहन गुंड

## जिल्हाधिकारानी ऊस दरा संदर्भात घेतलेल्या बैठकीमध्ये फक्त चर्चा ठोस निर्णय नाही आंदोलन सुरूच

बीड / प्रतिनिधी

बीड जिल्ह्यामध्ये जवळपास बीड जिल्ह्यामध्ये महिनाभरापासून जवळपास जिल्ह्यातील सर्व साखर कारखाने चालू झाले आहेत गुळ उद्योग देखील सुरू झाले आहेत. जिल्ह्यातील सर्व शेतकरी संघटनेने एकत्र येत शेतकरी संघर्ष समितीच्या माध्यमातून दोन रस्ता रोको आंदोलन केले लेखी आश्वासनाच्या नंतर आंदोलन स्थगित करून जिल्हाधिकारी यांनी संबंधित अधिकारी, साखर कारखानदार व शेतकरी संघटनेचे प्रतिनिधीची बैकठ दिनांक २५ रोजी ५ वाजता जिल्हाधिकारी सभागृहामध्ये पार पाडली मात्र या बैठकीमध्ये इतर प्रश्नावर चांगली चर्चा झाली इतर प्रश्न मार्गी लागले. मात्र या वर्षी पहिला ऊस बिलाचा हप्ता किती देणार या संदर्भामध्ये ठोस निर्णय झालेला झाला नसल्यामुळे जिल्ह्यात सुरू असलेल्या आंदोलन चालू राहणार असल्याची माहिती शेकापचे नेते भाई मोहन गुंड यांनी दिली आहे

जिल्ह्यातील अजून एक ही साखर कारखाननी आपण पहिला हप्ता कितीने काढणार आहेत अजून गुपित आहे, एक तर कारखान्यांनी १४ दिवसाच्या आत शेतकऱ्यांना गाळप झाल्यापासून बिल देणे बंधनकारक आहे, हा नियम देखील कारखानदारांनी जवळपास नियमाचे पालन केलं नाही. कारखाना सुरू करण्याआधी आपण काय भाव देणार याची घोषणा करणे गरजेचे असताना देखील सर्व संचालक भ्र शब्द काढत नाहीत, चांगला भाव देऊ असे घोळक सर्वच कारखान्याचे संचालक बोलत आहेत, मनात पाप नसेल तर घोषणा करून तात्काळ पहिला ऊस गाळपाचा हप्ता कितीने देणार लेखी स्वरूपाचे पत्र कारखानदारांनी काढावे, एकतर शेतकरी रिकवरी मध्ये मध्ये मारला जातो एकाच भागातील कारखाने



वेगवेगळे भाव देतात, यामध्ये शेतकऱ्याचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते जिल्ह्यामध्ये जवळपास सात साखर कारखाने चालु झाले आहेत, भाव जाहीर न करणारा साखर कारखाना शेतकऱ्याची पोर चालू देणार नाहीत, याची नोंद साखर कारखानदारांनी आणि प्रशासनाने घ्यावी असे शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई मोहन गुंड यांनी प्रसिद्धी पत्रकात दिले.

जिल्हा व्यापारी महासंघ,सावित्रीबाई फुले संस्था,प्रेरणा संस्था व स्वतंत्र मजुर

# सामाजिक संस्थेच्या वतीने संविधान जनजागृती रॅलीत खाऊचे वाटप

धाराशिव /प्रतिनिधी

भारतीय संविधान दिन व भारतीय संविधानाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त सहाय्यक आयुक्त समाज कल्याण धाराशिव, शिक्षणाधिकारी, प्राथमिक व माध्यमिक शिक्षण विभाग धाराशिव,जिल्हा विधी सेवा प्राधिकरण धाराशिव आणि मतदार जनजागरण समितीच्या वतीने संविधान जनजागृती रॅली काढण्यात आली.रॅलीत सहभागी शाळा नर्सिंग कॉलेज विद्यार्थी यांना जिल्हा व्यापारी महासंघ,सावित्रीबाई फुले सामाजिक संस्था,प्रेरणा बहुउद्देशीय सामाजिक संस्था व स्वतंत्र मजुर युनियन सामाजिक संस्थेच्या वतीने बिस्किटे,मोतीचुर लाडु, राजगिरा लाडू,केळी देऊन खाऊचे वाटप करण्यात आले.



दरवर्षी संविधान दिनानिमित्त मतदार जनजागरण समितीच्या वतीने संविधान जनजागृती रॅली काढण्यात येते.भारतीय संविधान दिन हा राष्ट्रीय सण उत्सव असुन हा महोत्सव मोठ्या प्रमाणात साजरा केला पाहिजे. जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांच्या हस्ते रॅलीचे उद्घाटन करण्यात आले.यावेळी व्यापारी महासंघाचे जिल्हाध्यक्ष लक्ष्मीकांत जाधव,संजय मंत्री अमित मोदाणी,अझहर शेख,सावित्रीबाई फुले सामाजिक संस्थेचे अध्यक्ष महादेव भोसले,प्रेरणा बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या अध्यक्षा सौ.किरणताई निंबाळकर,युनिक सामाजिक संस्थेचे अध्यक्ष आनंद भालेराव यांच्या वतीने दरवर्षी प्रमाणे याही वर्षी रॅलीतील विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप केले. यावेळी मतदार जनजागरण समितीचे अध्यक्ष एम डी देशमुख,सचिव अब्दुल लतीफ, कार्याध्यक्ष गणेश वाघमारे, कोषाध्यक्ष शेख रौफ,सहसचिव बाबासाहेब गुळीग,उपाध्यक्ष सचिन चौधरी,सल्लागार बलभीम कांबळे,सदस्य श्रीकांत मटकिवाले,अमर आगळे सह समाज कल्याण विभाग,शिक्षण विभाग,विधी सेवा प्राधिकरणचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

# प्रभाग ९ राष्ट्रवादीच्या बाजूने झुकला

## एकनाथ (बबलू) टेकाळे यांच्या लोकविश्वासामुळे विजय निश्चित

देगलूर/प्रतिनिधी

देगलूर नगरपरिषद निवडणुकीत प्रभाग क्रमांक ९मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) साठी अनुकूल वातावरण दिवसेंदिवस दृढ होत असून, या प्रभागातील राजकीय समीकरणे एकनाथ (बबलू) टेकाळे यांच्या नावाभोवती स्थिरावताना दिसत आहेत. एकनाथ (बबलू) टेकाळे (०९-ब) आणि सौ. कृतिका पिटू जोशी (०९-अ) या दोन्ही उमेदवारांना मिळत असलेला उत्स्फूर्त जनसमर्थन पाहता, स्थानिक मतदार त्यांना आधीच विजयी उमेदवार म्हणूनच पाहत आहेत. या वातावरणामागील निर्णायक कारण म्हणजे बबलू टेकाळे यांची साधी, जमिनीवरची आणि सर्वांना सहजपणे आपलेसे करणारी 'डाउन टू अर्थ' ओळख.

समाजातील प्रत्येक घटकाच्या सुख-दुःखात उपस्थित



राहणारी त्यांची वृत्ती, कोणत्याही दिखाव्यापासून दूर राहून गरजूंना मदतीचा हात पुढे करण्याची तयारी, पूरपरिस्थिती असो वा रुग्णांची अडचण बबलू टेकाळे हे नाव देगलूरकरांसाठी विश्वासाचे आणि आधाराचे प्रतीक बनले आहे. त्यांचा साधेपणा आणि लोकांशी नातं जोडण्याची क्षमता हीच राष्ट्रवादी काँग्रेसच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. विजयमाला बालाजी टेकाळे यांच्या उमेदवारीसाठी मोठी ताकद ठरत आहे. घराघरातील संवादात नागरिक व्यक्त करत असलेल्या भावना आणि टेकाळे कुटुंबाबद्दलचा ओघळणारा विश्वास पाहता, या प्रभागातून त्यांना मोठी आघाडी मिळणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात वेगाने पसरत आहे.

प्रभाग ९ मध्ये निर्माण झालेला हा वातावरणीय कल फक्त स्थानिक पातळीपुरता मर्यादित नसून संपूर्ण देगलूरच्या निवडणूक वातावरणावर परिणाम करणारा ठरत आहे. टेकाळे कुटुंबाने उभारलेला लोकसंपर्क, सेवाभावी कार्याची परंपरा आणि नागरिकांशी राखलेली प्रामाणिक नाळ यामुळे या प्रभागात राष्ट्रवादी काँग्रेसची पकड अधिक मजबूत होत चालल्याची स्पष्ट चिन्हे दिसत आहेत. नागरिकांमध्येही एकच सूर उमटतो बबलू टेकाळे साधे आहेत, आपल्या मधले आहेत आणि म्हणूनच त्यांच्यावरचा विश्वास अढळ आहे.

या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक ९ राष्ट्रवादी काँग्रेसच्या निवडणूक यशाचा प्रमुख आधारस्तंभ ठरण्याची शक्यता वाढली असून, विजयमाला टेकाळे यांना मिळणारी वाढती लीड हीच आगामी निवडणुकीतील राजकीय समीकरणे बदलू शकते, असे निरीक्षकांचे मत आहे...



# शिदोड येथील श्री महालक्ष्मी विद्यालयात संविधान दिन उत्साहात साजरा

बीड /प्रतिनिधी

बीड शहरालगत असलेल्या शिदोड येथील शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळ, बीड संचलित श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयात संविधान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक डी.बी. चव्हाण हे होते. तर व्यासपीठावर ए.पी. वाव्हळ सर, श्रीमती फाटे, श्रीमती साळुंके, श्रीमती सानप आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि संस्थेचे संस्थाचालक स्व. गोविंदराव (नाना) वाघ यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. त्या नंतर संविधान वाचन, संविधान चित्रांचे प्रदर्शन, प्रश्नमंजुषा आणि वक्तृत्व स्पर्धा अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्यांनतर शाळेतील निवडक विद्यार्थ्यांनी संविधानाचे मूल्य, लोकशाहीची तत्वे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्यावर आधारित प्रभावी भाषणे केली. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन श्रीमती साळुंके मॅडम यांनी केले. कार्यकम यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

**स्व. गोविंदराव वाघ यांच्या स्मृतिनिमित्त वृक्षारोपण व शहीदांना मानवंदना**

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग अॅण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# अंबड नगर परिषद रणधुमाळी २०२५
# प्रभाग क्र.१ मध्ये विकासाचा झंझावात

## महायुतीचे झुंजार नेते गंगाधर भाऊ वराडे यांच्या विजयरथावर धडाकेबाज आगेकूच विरोधकांचे धाबे दणाणले



अंबड /प्रतिनिधी

अंबड नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीचा रणसंग्राम आता अक्षरशः तापला आहे आणि संपूर्ण शहरभरात सध्या एकाच गोष्टीची चर्चा आहे ती म्हणजे प्रभाग क्रमांक १ ची भारतीय जनता पार्टी आणि रासप (महायुती) गठबंधनाचे तरुण तडफदार आणि जनतेच्या मनात घर करणारे नेतृत्व श्री. गंगाधर भाऊ वराडे, यांनी आपल्या धडाकेबाज कामगिरीच्या बळावर प्रभागात एकतर्फी वातावरण निर्माण केले आहे. त्यांच्या विजयरथा ची धडाकेबाज आगेकूच पाहून विरोधकांचे अक्षरशः धाबे दणाणले आहेत. कामाचा धडाका विकासाचा झंझावात नगरसेवक म्हणून काम करताना गंगाधर भाऊ वराडे यांनी दाखवून दिले की विकास हे केवळ भाषणात नव्हे तर कृतीत दिसले पाहिजे वर्षानुवर्षे रखडलेले पाणी आणि रस्त्यांचे जटील प्रश्न मार्गी लावत त्यांनी नागरिकांना मोठा दिलासा दिला आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, वराडे यांनी विकास निधीच्या प्रतीक्षेत न राहता अनेकदा स्वखर्चातून पुढाकार घेतला.रस्ते दुरुस्त करणे मुरूम टाकणे अशी अत्यावश्यक कामे तातडीने करून त्यांनी लोकांच्या विश्वासाचा पाया अधिक भक्कम केला आहे. या सर्व उपक्रमांमुळे नागरिकांच्या हृदयात गंगाधर भाऊ वराडे यांचे स्थान विकासाचा खरा अर्थ दाखवणाऱ्या लोकप्रतिनिधी म्हणून अधिक दृढ झाले आहे. समाजसेवा लोकांमधील खरा नातेसंबंध गंगाधर भाऊ वराडे हे केवळ विकासपुरते नेते नाहीत तर सामाजिक जबाबदारी निभावणारे जनतेचे माणूस आहेत. शासकीय योजनांचा लाभ त्यांनी गरजू वृद्ध आणि महिलांना घरपोच सुविधा उपलब्ध करून दिला. गरीब आणि वंचितांना हक्काचे अन्नधान्य मिळावे म्हणून त्यांनी राबवलेली राशन कार्ड मोहीम ही नागरिकांचे काळीज जिंकणारी मोहीम ठरली आहे. हक्काचा माणूस २४ तास तत्पर वराडे यांचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यांची जनतेसाठी असलेली उपलब्धता सुख-दुःखात असो वा रात्री-अपरात्री मदतीसाठी एक हाक दिली की गंगाधर भाऊ वराडे तत्काळ उपस्थित होतात. नागरिकांच्या अडचणींमध्ये सहभागी होऊन त्यांच्या समाधानासाठी वणवण करणारा हा लोकप्रतिनिधी खऱ्या अर्थाने हक्काचा माणूस' ठरतो आहे.

गंगाधर भाऊ वराडे यांचा विश्वास

माझ्या प्रभागातील प्रत्येक नागरिक माझे कुटुंबच आहे. त्यांच्या सुख-दुःखात मी नेहमीच सोबत राहिलो आहे आणि राहणारही. विकासाची ही गंगा कधीच थांबणार नाही.

प्रभाग १ चा विकास हाच ध्यास या ब्रीदवाक्याने सज्ज झालेले गंगाधर भाऊ वराडे पुन्हा एकदा प्रभागाचा कायापालट घडविण्याच्या तयारीत आहेत. मतदारांचा त्यांना मिळत असलेला उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता या विजयरथास अडविणे विरोधकांसाठी अत्यंत कठीण ठरणार आहे असे चित्र सध्या प्रभाग क्र. १ मध्ये दिसत आहे.

# स्थानिक गुन्हे शाखेने गुटख्यासह २५ लाखाचा मुद्देमाल केला जप्त



बीड /प्रतिनिधी

बर्दापुर येथुन अंबाजोगाईकडे गुटख्याने भरलेली एक पांढ-या रंगाची इनिव्हा क्रिस्टा कार येणार असल्याची गुप्त माहिती मिळताच स्थानिक गुन्हे शाखेने धडाकेबाज कारवाई केली. सेलु अंबा रोडवरील टोल नाक्यावर पांढ-या रंगाची इनिव्हा क्रिस्टा कार क्रमांक चक१४ ऋण.०६९९ ही बर्दापुरकडुन आल्याची दिसली. तिच्यावर दि.२६.११.२०२५ रोजी ०५.०० वाजता छापा टाकुन कारवाई केली.गाडीचा वाहन चालक फारोख हामीद सय्यद वय ४५ वर्षे रा. सय्यद गल्ली माजलगाव यासह त्याच्या ताब्यातील वाहनामध्ये विविध कंपनीचा महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत केलेला ५,२६,२००/-रूपयाचा गुटखा मुद्देमाल मिळुन आला. वर नमुद गुटखा व इनिव्हा क्रिस्टा कार क्रमांक चक.१४ऋण.०६९९ असा एकुन २५,२६,२००/-रूपयाचा मुद्देमाल जप्त करून पोस्टे अंबाजोगाई ग्रामिण येथेगुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक बीड यांनी जिल्ह्यातील अवैध धंद्याचे समुळ उच्चटन करणे बाबतचे आदेश स्थानिक गुन्हे शाखेला दिलेले आहेत. त्याप्रमाणे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड स्था.गु.शा., बीड यांच्या आदेशाने उपविभाग अंबाजोगाई हद्दीत अवैध धंद्यावर कारवाई करणे करीता पोह/१४२९ केकान, १८३७ गिते, पोना/१९१८ भताने व पोअ. १०५५ अंधाळे असे रवाना झाले होते. ते पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, बर्दापुर येथुन अंबाजोगाईकडे गुटख्याने भरलेली एक पांढ-या रंगाची इनिव्हा क्रिस्टा कार येणार आहे. त्यांनी मिळालेल्या बातमीची माहिती पोनि सो यांना देवुन त्याच्या आदेशाने व मार्गदर्शनाखाली शेलु अंबा रोडवरील टोल नाक्यावर दोन पंचासह जावुन थांबुन नमुद वाहनाची खात्री केली असता टोल नाक्याजवळ एक पांढ-या रंगाची इनिव्हा क्रिस्टा कार क्रमांक चक१४ ऋण.०६९९ ही बर्दापुरकडुन आल्याची दिसली. तिचा संशय आल्याने तिच्यावर दि.२६.११.२०२५ रोजी ०५.०० वाजता छापा टाकुन वाहन थांबवुन वाहन चालकास त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे फारोख हामीद सय्यद वय ४५ वर्षे रा. सय्यद गल्ली माजलगाव ता. माजलगाव जि. बीड असे सांगितले, त्याच्या ताब्यातील वाहनाची झडती घेतली असता वाहनामध्ये विविध कंपनीचा महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत केलेला ५,२६,२००/-रूपयाचा गुटख्या मुद्देमाल मिळुन आला, वर नमुद गुटखा व इनिव्हा क्रिस्टा कार क्रमांक चक१४ऋण.०६९९ असा एकुन २५,२६,२००/-रूपयाचा मुद्देमाल जप्त करून पोस्टे अंबाजोगाई ग्रामिण येथे भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी मा. पोलीस अधीक्षक सो बीड, मा. अप्पर पोलीस अधीक्षक सो अंबाजोगाई यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि शिवाजी बंटेवाड यांच्या आदेशाने पोह/१४२९ केकान, १८३७ गिते, पोना/१९१८ भताने व पोअ. १०५५ अंधाळे स्थानिक गुन्हे शाखा बीड यांनी केली आहे.

## दुचाकीच्या धडकेने मंगरूळ येथील पादचारी ठार

शिराढोण /प्रतिनिधी

कळंब तालुक्यातील मौजे मंगरुळ येथील विनायक राजेंद्र कापसे (वय ५३) यांचा रस्ते अपघातात मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना दि. २२ नोव्हेंबर २०२५ रोजी संध्याकाळी ७.३० वाजण्याच्या सुमारास घडली.

जयभवानी हॉटेल जवळील जुनी जवळा पाटी परिसरातील देवधानोरा शिवारातून ते पायी जात असताना मोटरसायकल (क्र. एमएच ४४ ए.ए. १४४२) ने पाठीमागून जोरदार धडक दिली. ही मोटरसायकल आरोपी गुरुनाथ राजेभाऊ कसबे (रा. होळ, ता. केज, जि. बीड) यांच्या ताब्यात असून, त्यांनी ती हायगयी व निष्काळजीपणे चालविल्याने विनायक कापसे गंभीर जखमी झाले. उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला. या घटनेबाबत विनायक कापसे यांचे पुत्र प्रतीक विनायक कापसे (वय २१, रा. मंगरुळ) यांनी २४ नोव्हेंबर रोजी दिलेल्या प्रथम खबरीवरून शिराढोण पोलिस ठाण्यात भारतीय दंड संहिता कलम २८१, १०६(१), १२५(अ), १२५(ब) सह मोटार वाहन कायदा कलम १८४ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सदरील घटनेबद्दल पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे. अशी माहिती सूत्रांनी दिली.

# चिंचोटी येथे अज्ञात चोरट्याने शेतकऱ्याच्या गोठ्यातील दोन विद्युत मोटारी चोरल्या

वडवणी /प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील चिंचोटी येथील शेतकरी दत्तात्रय विश्वनाथ गोंडे यांनी गोठ्यात ठेवलेल्या पंचवीस हजार रुपये किमतीच्या दोन विद्युत पाणबुडी मोटर व वायर अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडलेली असून याप्रकरणी वडवणी पोलीस स्टेशनला अज्ञात चोरट्याविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल झाला आहे.

वडवणी तालुक्यातील चिंचोटी येथील शेतकरी दत्तात्रय विश्वनाथ गोडे हे शेती करुन कुंटुबाची उपजिवीका भागवितात त्याना चिंचोटी शिवारात गट नं २३४ मध्ये त्यांची शेती असुन शेजारी एक तलाव आहे. व एक विहिरीवर शेतीला पाणी देण्यासाठी टेक्सीमो कंपनीची ५ एच.पी ची ईलेक्ट्रीक पानबुडी मोटार दोन मोटार वायरसह बसवलेली होत्या दिनांक २३/११/२०२५ रोजी ते शेतात दिवसभर कापूस वेचणीचे काम करुन संध्याकाळी ०६.३० वा वापस घरी येत असतांना त्यांनी विहिरीवरील ईलेकट्रीक पानबुडी मोटार तलावावरील मोटार हया दोन्ही मोटार त्यानी कोट्यावर आणुन ठेवलेली होत्या यामध्ये एक मोटार हि जळालेली होती. व दुसरी तलावातील पाणी संपल्या मुळे त्यांनी दोन्हीं मोटार कोठ्यावर आणून ठेवलेल्या हया दिनांक २४.११.२०२५ रोजी ते सकाळी ०६:०० वाजता शेतातील कोठ्यावर धार काढण्यासाठी गेले असता तेथे ठेवलेल्या दोन्ही ईलेक्ट्रीक पानबुडी मोटार त्या ठिकाणी मोटार त्यांना दिसुन आली नाहीत. त्यानंतर त्यांनी शेता शेजारी शेतकरी याच्याकडे जावुन त्यांनी माझ्या विहिरीवरील तलावावरील कोठ्यावर ठेवलेल्या पानबुडी मोटार बाबत विचारपुस केली असता त्यांनी सांगितले की, आम्हांला माहिती नाही. त्यानंतर त्यांच्या लक्षात आले की, कोठ्यावरील मोटार हया कोणीतरी अज्ञात चोरट्याने ईलेक्ट्रीक पानबुडी दोन मोटार व दोनशे फुट वायर हे अज्ञात चोरट्याने चोरून नेले आहे तरी याप्रकरणी दत्तात्रय गोडे यांनी वडवणी पोलीस स्टेशनला दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल झाला आहे या प्रकरणाचा पुढील तपास सपोनी वर्षा व्हगाडे मॅडम ह्या करत आहेत.तरी वडवणी तालुक्यात ग्रामीण भागात चोरीच्या घटनामध्ये वाढ झालेली असुन चोरट्यानी पोलिसां समोर



तेलंगणा - हैदराबाद येथे तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवण रेड्डी यांचा काँग्रेसच्या नेत्या खा.सौ. रजनीताई पाटील यांनी सत्कार केला. यावेळी प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस आदित्य दादा पाटील व बीड जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष राहुल भैय्या सोनवणे.

# गांधीनगर सभेला जनतेचा उदंड प्रतिसाद.!

## आ. संदीपभैया गांधीनगर परिसराचा कायापालट करतील



बीड /प्रतिनिधी

गांधीनगर हा बीड शहराचा विस्तारित भाग. या भागात गोरगरीब जनता मोठ्या प्रमाणात राहते. या भागात रस्ते पाणी लाईट मूलभूत सुविधांची सुव्यवस्था पोहोचलेली नाही. आगामी काळात या भागाचा कायापालट करण्यासाठी आ. संदीपभैया क्षीरसागर ,सलीम भाई बीड नगरपालिकेच्या माध्यमातून विकासाला गती देतील असा विश्वास यावेळी राजेंद्र मस्के यांनी दिला.

गांधीनगर प्रभाग क्र. २६ (अ) व २६ (ब) मध्ये आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ भव्य कॉर्नर सभा आ. संदीप भैय्या क्षीरसागर, माजी आमदार सय्यद सलीम भाई, राजेंद्र मस्के,शिवसेना (उबाठा) जिल्हाप्रमुख गणेशराव वरेकर, परमेश्वर सातपुते, वैजनाथ तांदळे तसेच आघाडीचे प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्या उपस्थितीत संपन्न झाली. या सभेला गांधीनगर परिसरातील नागरिकांनी प्रचंड गर्दी केली होती.



# राजीव गांधी महाविद्यालयात संविधान दिन साजरा

मुदखेड /प्रतिनिधी

राजीव गांधी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि राज्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने, प्राचार्य डॉ. ए. टी. शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयातील मराठी विभागाचे प्रमुख डॉ. माधव बसवंते होते. मंचावर राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रकाश कोथळे यांची विशेष उपस्थिती होती.कार्यक्रमाची सुरुवात भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेच्या पूजनाने करण्यात आली. त्यानंतर उपस्थितांनी सामूहिकरीत्या भारतीय संविधानातील उद्देशिका वाचन करून संविधानाबद्दलची निष्ठा व्यक्त केली. अध्यक्षीय समारोप डॉ. माधव बसवंते यांनी केला.कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. दत्ताजी मेहेत्रे यांनी केले, तर आभार डॉ. सतीश उमाटे यांनी मानले.

# वाळू तस्करीचा मास्टरमाइंड कोण; जाफ्राबाद तहसीलदारांची चुप्पी का

जाफ्राबाद /हरी भालके

अवैध वाळू व्यवसायाचे पायेमुळे खोलवर रूजली आहेत. जाफ्राबाद ते बुलढाणा , जालना असे वाळूतस्करीचे कनेक्शन आहे. जाफराबाद तहसीलदारांच्या आशीर्वादाने हा खेळ सुरू आहे.वाळु तस्कर जाफराबाद मध्ये मास्टरमाइंड असून तो महसूल, पोलिस, आरटीओला बिदागी पोहोचवित असल्याने 'सब कुछ ओके' असा हा वाळूचा कारभार सुरू आहे. भरदिवशी कोट्यवधींची उलाढाल वाळू तस्करीतून होत असल्याचे वास्तव आहे.

जिल्हाधिकारी मित्तल यांच्या निर्देशानुसार झिरो रॉयल्टी बंद करण्यात आली आहे. यामागे अवैध वाळू वाहतूक, वाळू तस्करीला लगाम लावणे हा प्रमुख उद्देश आहे. मात्र तहसीलदार सारिका भगत याकडे कोणतेही लक्ष देत नाही त्याचं कारण वाळू तस्करांना पाठीशी घालन एसडीओ यांनीच अवैध वाळू तस्करीला हिरवी झेंडी दिली म्हणून जाफराबाद तहसीलदारांनी लक्ष्मी येता घरी तोच दसरा, दिवाळी असे म्हणत रात्रीतून वाळू



वाहतुकीला मूक संमती देत तस्करांसाठी रान मोकळे केले आहे. यासंदर्भात तहसीलदारांना नागरिकांनी सातत्याने संपर्क साधला त्यांनी प्रतिसाद दिला नाही, हे विशेष.

वाळू टिप्पर ट्रॅक्टर पोलिस आरटीओ यांन दिसेना. वाळू तस्करी, रॉयल्टी वसुलीसाठी वापरले जात असलेले तहसील पथकाला व मंडळ अधिकाऱ्याला ट्रॅक्टर टिप्पर या वाहनाला कुणाचे अभय आहे, या विषयी चर्चा रंगत आहे. दिवसा वाहनांची तपासणी हा केवळ देखावा परंतु रात्रीचा खेळ चाले देवान घेवाण चा....रात्रीला वाळू उपसल्या जाते आणि सकाळी अधिकारी जाऊन त्या खड्ड्याची निरीक्षण करतेमात्र, रात्रीतून वाळू तस्करी कुणाच्या आशीर्वादाने केली जाते, याबाबत जिल्हाधिकारी मित्तल यांनी यांनी शोधमोहीम राबविल्यास 'महसूलच्या दिव्याखाली अंधार असल्याचे दिसून येईल.

दोन पोलिस ठाणी, आरटीओ, तहसीलदारांची बल्ले-बल्ले

जाफराबाद तालुक्यातील वाळू नदीतून बाहेर पडल्यावर वाहन पोलिसांना बिदाई दिल्यानंतर बुलढाण्याच्या दिशेने वाळू तस्करीचा प्रवास सुरू होतो.

अधिकाऱ्यांच्या समोरच अवैध वाळू तस्करीचे वाहन तहसीलदाराच्या कार्यालयाच्या सीमेतुन राजरोसपणे आणले जाते.

झिरो रॉयल्टी बंद असताना वाळूची वाहने रस्त्यावर कशी?

प्रशासनाने झिरो रॉयल्टी बंद केली असताना अवैध वाळू वाहतूक करण्यासाठी भरदिवशी शेकडो वाहने रस्त्यावर धावत आहेत. नदीतून वाळू आणली जाणारी ही नियमबाह्य असून पोलिस, आरटीओ, महसूलचे अभय आहे. वाळू वाहतूकदारांकडून तहसीलचाच पथक वसूल करत असल्याचं विश्वसनीय माहिती आहे. त्यामुळे आरटीओ, एलसीबीच्या फिरत्या पथकावरही ' वाळू तस्करींचं नियंत्रण आहे.

## कानडीतील शेतकऱ्याची शेळी बिबट्याच्या तावडीत; गावकऱ्यांच्या धाडसाने थोडक्यात बचाव

तळणी /वार्ताहर :- मंठा तालुक्यातील कानडी येथे बिबट्याने अचानक हल्ला चढवून शेतकऱ्याच्या शेळीला झुडपात ओढत नेल्याची घटना ता. २६ रोजी दुपारी सुमारास ३ वाजता घडली. निवृत्ती संजय बांगर यांच्या शेळीवर बिबट्याने झडप घालून तिला ओढू लागल्याने काही क्षणांतच खळबळ उडाली. तत्पर गावकऱ्यांच्या धाडसामुळे मात्र मोठा अनर्थ टळला.

घटनेच्या वेळी परिसरात आरडाओरडा झाल्यानंतर ग्रामस्थांनी धाव घेतली. रामदाजी वाघ, उत्तमराव खंदारे, प्रविण महाराज खंदारे, राम पवार, कल्याण बोराडे, राजेभाऊ खंदारे, शिवम खंदारे व रोहिदास बागार यांनी धाडसाने पाठलाग करत शेळीला बिबट्याच्या तावडीतून सुटका करून सुरक्षित बाहेर काढले.

दरम्यान, माहिती मिळताच वनरक्षक आर. बी. बनसोडे यांनी घटनास्थळी भेट देत परिसरात बिबट्याच्या पाऊलखुणांची पाहणी केली. तसेच बिबट्या परत दिसल्यास काय काळजी घ्यावी, याबाबत ग्रामस्थांना मार्गदर्शन केले.

शेळीच्या गळ्याभोवती बिबट्याचे दात बसल्यामुळे ती अत्यंत भयभीत झाली असून उपचारांची गरज असल्याचे सांगण्यात येत आहे. या प्रकारामुळे शेतकरी निवृत्ती बांगर



यांचे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता आहे.

शेळी ही नाजूक जात असल्यामुळे तिच्यावर झालेल्या धक्क्याचा प्रतिकूल परिणाम होऊ शकतो. त्यामुळे या घटनेची नुकसानभरपाई वनविभागाने शेतकऱ्याला द्यावी.

कृष्णा खंदारे सरपंच,कानडीकानडी परिसरात गेल्या काही दिवसांत वन्यप्राण्यांचा वावर वाढत असून ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर वनविभागाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# टाकळखोपा येथे अवैध वाळू वाहतूक उघड

## तहसीलदारांच्या पथकाची दोन टिप्परवर कारवाई ; एक टिप्पर पसार

तळणी वार्ताहर:- मंठा तालुक्यातील टाकळखोपा येथुन किनीद्वारे अवैध वाळू उपसा व वाहतूक सुरू असल्याची गुप्त माहिती मिळताच तहसीलदार सुमन मोरे यांच्या पथकाने ता.२६ रोजी कारवाई केली.तर एक टिप्पर पळून जाण्यात यशस्वी झाला असून त्यावर काय कारवाई होणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

तळणी परिसरातील रोडवर शासकीय किंवा खाजगी वाहन दिसताच वाळू माफियांची संपूर्ण यंत्रणा सतर्क होते, अशी वस्तुस्थिती असूनही महसूल पथकाने खबर्यांना चकवा देत अवैध वाहतूक करणाऱ्या दोन विनानंबर टिप्पर पकडले.ही कारवाई शिरपूर-तळणी रोडवर पथक प्रमुख नायब तहसीलदार कल्याण काळदाते, महसूल अधिकारी नितीन चिंचोले, प्रशांत हरिचंद्रे, बीट जमादार नामदेव राठोड, अमोल जेईद, कोतवाल राऊत यांनी केली




जप्त करण्यात आलेले दोन्ही टेम्पो पुढील कार्यवाहीसाठी शासकीय गोडाऊनमध्ये जमा करण्यात आले आहेत.महसूल विभागाच्या या कारवाईमुळे परिसरातील अवैध वाळू उपसा व वाहतूक करणाऱ्यांमध्ये एकच खळबळ उडाली आहे.



## दावरवाडी येथे खंडोबा यात्रे निमित्त बारा गाड्या....!

पैठण प्रतिनिधी/ वृत्तसेवा

दावरवाडी येथे सालाबादप्रमाणे यंदाही मोठ्या उत्साहात चंपाषष्ठी निमित्त खंडोबा यात्रेचे नियोजन व बारा गाड्या कमीटी व गावाच्या वतीने ठेवण्यात आले होते सकाळपासुनच खंडोबा यात्रेनिमित्त खंडोबा मंदिरात भक्तांची दर्शनासाठी रांगा होत्या ब्राह्मण यांच्या हस्ते खंडोबा देवाचे पाठपूजन करून साडेअकरा वाजता प्रसिद्ध कीर्तनकार ह भ प रामानंदचार्य नामदेव महाराज पोकळे यांचे कीर्तन झाले त्यानंतर मंदिरात महाप्रसादाचा लाभ भाविक भक्तांनी घेण्यात आला संध्याकाळच्या वेळेस बारा गाड्यांचे नियोजन ठेवण्यात आले होते बारा गाड्या ओढणारे खंडोबा भक्त साहेबराव धारे यांच्या हस्ते बारा गाड्यांची पाटपूजन मंत्रविधी करून बारा गाड्या ओढण्याला सुरुवात होती बारा गाड्या पाहण्यासाठी गावातील महिला पुरुष व तालुक्यातून व सर्कल मधून गावातील हजारो भाविक भक्त बघण्यासाठी दरवर्षी येतात याही वर्षी बारा गाड्या उत्सव येळकोट येळकोट जय मल्हार घोषणा देत खंडोबा यात्रा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला

# संविधान दिन उत्साहात साजरा अंकुशराव टोपे महाविधालयात मूल्योंच्या पालनाचा दृढ संकल्प

जालना /प्रतिनिधी :- अंकुशराव टोपे महाविद्यालय जालना येथे दि.२६ नोव्हेंबर २०२५ रोजी संविधान दिन उत्साहात आणि अभिमानाने साजरा करण्यात आला.भारतीय लोकशाहीचा आत्मा असलेल्या संविधानाच्या उद्देशिकेचे झीश-रालश्रश सामूहिक वाचन करून कार्यक्रमाला भव्य सुरुवात झाली.कार्यक्रमात प्राचार्य डॉ. दादासाहेब गजहंस यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले की सामाजिक न्याय समता स्वातंत्र्य आणि बंधुता हीच आपल्या लोकशाहीची



जीवनवाहिनी आहे.प्रत्येक नागरिकाने आपल्या अधिकारांसोबतच कर्तव्यांचेही भान ठेवून संवैधानिक मूल्यांना बळकटी देण्याचे आवाहन त्यांनी केले.या प्रसंगी उपप्राचार्य डॉ. संजय पाटील प्रा.पांडुरंग खोजे, डॉ. पंडित रानमाळ डॉ.रामनाथ सांगुळे, डॉ. संतोष करवंदे प्रा. रामप्रसाद भालेकर,सुरेश चव्हाण यांसह मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना छडड विभागाने केले होते. सूत्रसंचालनाची जबाबदारी डॉ.अन्सारी मसूद यांनी प्रभावीपणे पार पाडली.

सामूहिक वाचन मार्गदर्शन आणि चर्चेनंतर सर्वांनी संविधानाची प्रतिष्ठा राखण्याचा आणि त्यातील मूल्यांचे पालन करण्याचा दृढ संकल्प व्यक्त केला.देश प्रथम संविधान सर्वोच्च या भावनेने भारलेला समारंभ देशभक्तीचा आणि संवैधानिक जबाबदारीची जाणीव करून देणारा ठरला.



## देऊळझरीच्या जिल्हा परिषद शाळेचा केंद्रस्तरीय प्रश्न मंजुषा स्पर्धामध्ये तालुक्यात प्रथम

जाफ्राबाद /हरी भालके

जाफ्राबाद:- दि .२४ जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा देऊळझरी येथे केंद्रस्तरीय प्रश्नमंजुषा या स्पर्धेचे आयोजन ठिक ११-०० वाजता करण्यात आले होते या स्पर्धेत केंद्रांतर्गत सर्व शाळेनी सहभाग घेतला. स्पर्धा अतिशय चांगल्या झाल्या वर्ग १ ली ते५ वी या गटात जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा देऊळझरी व वर्ग ६ वी ते वर्ग ८ वी या गटात सुद्धा जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा देऊळझरी या शाळेने दणदणीत विजय मिळवला त्याबदल सर्व विजय विद्यार्थी, शाळेतील सर्व मेहनती व प्रमाणिक शिक्षक व शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष, सर्व सदस्याचे अगदी मनापासून हार्दिक हार्दिक अभिनंदन व पुढील वाटचालीस खुप खुप शुभेच्छा. स्पर्धा घेण्यासाठी केन्द्रा अंतर्गत मुख्याद्यापक ,सहशिक्षक यांनी अतिशय चांगले सहकार्य केले. त्याचे अगदी मनापासून धन्यवाद व आभार केन्द्रप्रमुख श्री. एस. पी. अवकाळे

## चौसाळा येथिल युवक प्रज्वल ( बंटी)लगाडे बेपत्ता

चौसाळा ।प्रतिनिधी

बीड तालुक्यातील चौसाळा येथिल युवक प्रज्वल( बंटी)विलास लगाडे हा रागाने घरातुन निघुन गेला आहे याबाबतीत त्याच्या नातेवाईकांनी सगळीकडे शोध घेतला आहे परंतु तो



मिळुन आलेला नाही सदरील युवकाने त्याच्या इन्स्टा ग्राम आयडी वरुन त्याच्या भावास मेसेज केला आहे की मी सुखरुप असुन मी पुणे याठिकाणी आहे मला शोधण्याचा प्रयत्न करु नका रागाच्या भरात सदरील युवक घरातुन निघुन गेला असुन याबाबतीत नेकनुर पोलीस स्टेशन याठिकाणी बेपत्ता असल्याची तक्रार त्याचे वडील विलास लगाडे यांनी दिली असुन सदरील युवक कोणाला दिसल्यास नेकनुर पोलीस व त्याचे वडील विलास लगाडे मो. ९९२२२५२६७२, त्याचा भाऊ रितेश लगाडे ९७६३१२३६३५ यांच्याशी संपर्क साधावा अशी विनंती केली आहे.

# मुजीब भाईंना ताकद देण्यासाठी समाजाने घड्याळीच्या पाठीशी उभे राहणे काळाची गरज - वसीम लाला

## कोणत्याही आमीष आणि भूलथापांना मुस्लिमांशी बळी पडू नये



बीड ।प्रतिनिधी

शहराच्या व मुस्लिम वस्त्यांच्या विकासासाठी आपल्या हक्काचा आणि कामाचा माणूस असलेल्या शेख मुजीब भाई यांना बळ देण्यासाठी समाजाने घड्याळीच्या पाठीशी उभे राहणे काळाची गरज आहे. पण तुम्हाला विविध आमिष दाखवलं जाईल त्या भूलथापांना फसून तुम्ही वेगळा निर्णय न घेता एकच मीशन प्रेमलता पारवे नगराध्यक्ष आणि अजित पवारंच्या राष्ट्रवादीची नगरपरिषदेत शासन हे धोरण राबविण्याचे आवाहन युवक कार्यकर्ता वसीम लाला यांनी केले आहे.

मागील ३० ते ४० वर्षांपासून एकाच घरात बीडची सत्ता असूनसुद्धा मुस्लिम बहुल भागात कोणत्याही सुविधा नाहीत. उकिरडा बरा अशी अवस्था मुस्लिम वस्त्यांची असून, पावसाळ्यात चिखल आणि उन्हाळ्यात हंडाभर पाण्यासाठी वणवण अशी मुस्लिमांची अवस्था करण्यात आली आहे. याला कारण केवळ नामधारी चेहरे पुढे करून सत्ता भोगली आहे. पण आता सामाजिक जाण असलेले शेख मुजीब भाई हे निवडणुकीच्या रणांगणात असून, ही नामी संधी मुस्लिमांसाठी आलेलली असून 'अभी नहीं तो कभी नहीं' हा विचार करुन बीड शहर आणि मुस्लिम बहुल भागातील समस्या सोडविण्यासाठी आणि शहरात शांतता आणि विकासाच्या नव्या वाटेवर घेऊन जाण्यासाठी शेख मुजीब भाई यांना ताकद देण्यासाठी समाजाने कोणत्याही आमिषाला बळी न पडता बीड नगरपरिषदेत राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा पवार पक्षाचे शासन हेच मिशन राबवून येत्या २ तारखेला घड्याळ या चिन्हावरील नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार प्रेमलता पारवे यांच्यासह सर्व नगरसेवक पदाच्या उमेदवारांना विजयी करावे असे आवाहन वसीम लाला यांनी केले आहे.

## साञा येथील कर्जबाजारी शेतकऱ्याची आत्महत्या

चौसाळा ।प्रतिनिधी

बीड तालुक्यातील चौसाळा येथून जवळ असलेल्या साञा येथिल शेतकरी नवनाथ हरिबा काळे ( वय : ५५) यांनी शेतातील सततची नापिकी आणि



कर्जबाजारी पणाला कंटाळुन दिनांक २५ नोव्हेंबर मंगळवार रोजी पहाटे साडे पाच च्या दरम्यान स्वतःच्या शेतात चिंचेच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. सदरील शेतकऱ्याला चार एकर कोरडवाहू जमीन आहे. यावर्षी मोठ्या प्रमाणात झालेली अतिवृष्टी यामुळे शेतामध्ये नापिकी झाली. शेतामधून कुठलेच उत्पन्न मिळणार नसल्याने अगोदरच डोक्यावर असलेले कर्ज कसे फेडायचे या विवंचनेतून शेतकरी नवनाथ हरिबा काळे यांनी आत्महत्या केली असल्याची माहीती मिळाली आहे त्यांच्या कुटुंबीयांकडून देण्यात आली. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

# हरणाला गाडीची धडक; गावकऱ्यांच्या तत्परतेने मिळाले जीवदान

पाटोदा । प्रतिनिधी

धनगर जवळका शिवार येथे मंगळवारी रात्री सुमारे ९ वाजता अज्ञात वाहनाने एका हरणाला जोरदार धडक दिली. घटनेची माहिती मिळताच गावातील युवक तात्काळ घटनास्थळी धावून गेले. जखमी हरण रस्त्याच्या खालील खड्ड्यात पडलेले आढळले. मित्रमंडळींनी कोणतीही वेळ न दवडता हरणाला सुरक्षितपणे बाहेर काढले.

जखमी हरणाबाबतची माहिती मजूर पवार यांनी फोनद्वारे वन विभागाला दिली. त्यानंतर पगार प्रभारी वनाधिकारी देवगुड यांच्याशी संपर्क साधण्यात आला. त्यांनी दिलेल्या सूचनांनुसार तातडीने वाहनाची व्यवस्था करून हरणाला उपचारासाठी सर्पराज्य प्रकल्प, शिरूर कासार येथे रवाना करण्यात आले. या वेळी वन विभागातील नागरगोजे यांनीही मदत केली.बचाव मोहिमेत गावातील युवकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. यात अजित काळे, सावकार



काळे, अविनाश काळे, सागर गाडेकर, शंकर गोरे, नाना ढेकळे, वसंत गाडेकर यांचे विशेष योगदान राहिले.

युवा नेता सचिन मेघडंबर यांचे कौतुक

गेल्या वर्षीही याच ठिकाणी एका हरणाला अज्ञात वाहनाने धडक दिली होती. तेव्हा गावकऱ्यांच्या मदतीने हरणाचे प्राण वाचवले. यावर्षीही सर्वांच्या तत्परतेमुळे जखमी हरणाला जीवदान मिळाले. सर्वांचे मनःपूर्वक आभार,

- सचिन मेघडंबर, जिल्हा उपाध्यक्ष, वंचित बहुजन आघाडी, बीड.

# दिंद्रुड येथील मुस्लिम कब्रस्तानात आठवडी बाजार थांबवण्याचा वक्फ न्यायाधिकरणाचा महत्त्वाचा मनाई आदेश

## दिंद्रुड ग्रामपंचायतीने मुस्लिम कब्रस्थानात आठवडी बाजार भरवू नये न्यायालयाचे आदेश

दिंद्रुड ।प्रतिनिधी

दिनांक १९ नोव्हेंबर २०२५ दिंद्रुड ता.माजलगाव, जि. बीड दिंद्रुड गावातील मुस्लिम समाजाच्या कब्रस्तानाचा बराच काळ होत असलेला अनादर आणि धार्मिक भावनांची विटंबना अखेर न्यायालयाच्या दारात मांडली गेली आणि महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरणाने अत्यंत महत्त्वाचा व संवेदनशील निर्णय देत दिंद्रुड ग्रामपंचायतीला कब्रस्थानात आठवडी बाजार भरविण्यास मज्जाव केला आहे. मौजे दिंद्रुड येथील जमीन गट क्र. ७३१ (जुना सर्वे क्र. १४ क्षेत्र ३ एकर ही जमीन शासन नोंदीप्रमाणे सन १९७४ पासून मुस्लिम समाजाचे अधिकृत कब्रस्तान म्हणून नोंदलेली असून महसूल नोंदवहीतही ती मुस्लीम कब्रस्तान म्हणून स्पष्ट नमूद आहे. तरीदेखील ग्रामपंचायत तर्फे रविवारचा आठवडी बाजार थेट कब्रस्थानाच्या जागेत भरवण्यात येत होता. दुकाने थेट कबरींवर लावली जात होती, मृतांच्या पवित्र विश्रांतीस्थळावर व्यापाराची गजबज, आवाज, कचरा यामुळे या जागेचा



होत असलेला अनादर पाहून मुस्लिम समाजात तीव्र भावना व वेदना निर्माण झाल्या होत्या.या पवित्र स्थळाचे रक्षण करण्यासाठी आणि कब्रस्थानाची विटंबना थांबवण्यासाठी दिंद्रुड येथील मुतवल्ली व मुजावर शेख अखिल चाँद पटेल, इलियास नवाब शेख आणि मौलाना फारुख पठाण व अखिल भाई सय्यद त्यांच्या समवेत सर्व मुस्लिम बांधव यांनी ॲड. जावेद देशमुख व ॲड. मोहीद देशमुख यांच्या मार्फत महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरण, छ. संभाजीनगर (औरंगाबाद) येथे दावा दाखल केला. या प्रकरणात वक्फ बोर्डाच्या बाजूने ॲड. रमीज शेख यांनी सुरवातीपासून युक्तिवाद ॲड शरद सोळंके,विक्रम कदम यांनी युक्तिवाद केला.व संबंधित प्रकरणात स्थगिती आणली होती. सुनावणीदरम्यान कब्रस्थानाची पवित्रता, शासन नोंदीतील अधिकृत पुरावे, तसेच कबरींवरच बाजाराच्या दुकानांचे उभारले जाणारे चित्र न्यायालयाने गांभीर्याने घेतले.आणि अखेर दि. ०७/११/२०२५ रोजी मा. न्यायाधिकरणाचे चेअरमन तथा जिल्हा न्यायाधीश श्री. आदिल एम. खान आणि सदस्य मोहम्मद मोहिनुद्दीन मोईद यांनी अत्यंत महत्त्वाचा

आदेश देत दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत दिंद्रुड येथील मुस्लिम कब्रस्थानात ग्रामपंचायतीने आठवडी बाजार भरवू नये.असा स्पष्ट व कडक मनाई हुकूम पारित केला.या निर्णयामुळे कब्रस्थानाचा होत असलेला अनादर, कबरींवरील अतिक्रमण, कचरा व गोंधळाला पूर्णविराम मिळणार असून समाजात मोठा दिलासा निर्माण झाला आहे.

## जिंतूर प्रभाग क्रमांक पांच चे उमेदवार
# हवेत फक्त नवमतदारांना घलत आहे भुरळ

प्रतिनिधी @ जिंतुर

नगर परिषद निवडणुकीत सर्व प्रभागातून सर्वच प्रभागात उमेदवार आप आपल्या प्रभागातील सर्वच जाती धर्मातील मतदारांच्या घरोघरी जाऊन मतांचा जोगवा मागत आहे त्यांच्याशी संवाद साधत आहे त्यांच्या ज्या काही समस्या आहेत ते जाणुन घेण्याचा प्रयत्न करीत आहे आपण काय काय करणार आपला अजंटा काय आहे त्यांच्या वर कसे काम करणार आहे हे समजून सांगण्याचा प्रयत्न करतं आहे पण पांच मध्ये या उलट चित्र पहावयास मिळत आहे

या प्रभागात उमेदवार हवेत वावरताना दिसतात त्यांना उच्च शिक्षीत प्रतिष्ठीत सुजाण मतदारांशी काही देणे घेणे दिसत नाही फक्त युवा शक्ती मतदारांशी संवाद साधला जातो युवा मतदारांचा फौज फाटा घेऊन ते रात्रंण दिवस फिरत आहे या निवडणुकीत आपण आपल्या प्रभागात काय काय विकास कामे करणार प्रभागातील गोर गरीब मतदारांसाठी कोण कोणत्या योजना राबवल्या जातील त्यांच्या मुलाबाळां साठी शैक्षणिक सुविधा उपलब्ध करण्याचे काय अजंटा आहे ह्याचं त्यांना काही घेण देण नाही फक्त पक्षांच्या चिन्हावरच आपण निवडून येण्याचा भास त्यांना झालेला दिसतो आपल्या मागे आपले दिग्गज नेते आपल्या मागे खंबीरपणे उभे आहे आपण कशाला मतदारांचे उंबरठे झीजवायचे आपल्या प्रभागात शेवटच्या शनी नेत्यांना फेरफटका मारायला लावू त्यांच्या सोबत पक्षांचे कार्यकर्ते राहणारच नेते आलें की हवा आपोआप फिरते व आपोआप मतदार आपल्याला मतदान करणारच आणि आपण निवडून येणारच या भरवश्यावर उमेदवार बसले आहे प्रभाग क्रमांक पाच चे उमेदवारच हवेत तर मतदारांचा तर कौलं कोणाकडे राहणार नेत्यांना पाहुण की उमेदवाराला पाहुण हे एक न समजणारे कोडेच?

नगर परिषद निवडणुकीत सर्व प्रभागातून सर्वच प्रभागात उमेदवार आप आपल्या प्रभागातील सर्वच जाती धर्मातील मतदारांच्या घरोघरी जाऊन मतांचा जोगवा मागत आहे त्यांच्याशी संवाद साधत आहे त्यांच्या ज्या काही समस्या आहेत ते जाणुन घेण्याचा प्रयत्न करीत आहे आपण काय काय करणार आपला अजंटा काय आहे त्यांच्या वर कसे काम करणार आहे हे समजून सांगण्याचा प्रयत्न करतं आहे पण पांच मध्ये या उलट चित्र पहावयास मिळत आहे

# संजयनगर आता विकासापासून वंचित राहणार नाही - अमरसिंह पंडित

## संजयनगर मधील कॉर्नर बैठकीला उत्स्फुर्त प्रतिसाद





गेवराई (प्रतिनिधी)

गेवराई नगर परिषद निवडणुकीतील नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. शितलताई दाभाडे व नगरसेवक पदाच्या सर्व उमेदवारांच्या प्रचारार्थ माजी आ. अमरसिंह पंडित यांनी गेवराई शहरातील विविध प्रभागात मतदारांच्या गाठीभेटी घेऊन विकासाच्या मुद्यांवर राष्ट्रवादीच्या सर्व उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन केले. प्रभाग क्र. १ व ३ मध्ये मतदारांशी संवाद साधताना ते म्हणाले की, संजयनगर हा भाग कायम विकासापासून वंचित राहिलेला आहे. विरोधकांनी सत्ता असतानाही या भागाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्यामुळे हा भाग कायम अविकसित राहिला. पण येणाऱ्या काळात नगर पालिकेची सत्ता आपल्या ताब्यात आल्यानंतर संजयनगर भागाचा कायापालट करून वंचित लोकांना हक्काचा पीटीआर, घरकुल, समाजमंदिर, अंगणवाडी यांसारखे दुर्लक्षित प्रश्न निकाली काढू. संजयनगरच्या विकासासाठी मतदार बांधवांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या ताब्यात गेवराई नगर परिषद घेऊन काम करण्याची संधी द्यावी असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

गेवराई नगर परिषद निवडणुकीतील नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ.शितलताई दाभाडे व प्रभाग क्र. १ मधील उमेदवार सौ. गंगासागर विठ्ठल पवार व भास्कर भिकाजी काकडे तर प्रभाग क्र. ३ मधील उमेदवार विलास दौलत गुंजाळ व नजमा बेगम निजाम शेख या उमेदवारांच्या प्रचारार्थ माजी आ. अमरसिंह पंडित यांनी मतदारांच्या गाठीभेटी घेऊन सुसंवाद साधला. अमरसिंह पंडित यांच्या या डोअर टू डोअर भेटीमुळे मतदारांमध्ये उत्साह संचारला आहे.यावेळी बोलताना अमरसिंह पंडित पुढे म्हणाले की, संजयनगर या दुर्लक्षित भागात येणाऱ्या काळामध्ये मुलांसाठी अंगणवाड्या, मुलांसाठी मध्यान्ह भोजन त्याचबरोबर या भागातील रस्ते, नाली बांधकाम आदी विकास कामांबरोबरच नागरीकांना पिण्याचे पाणी नियमितपणे पुरविण्यासाठी नळ योजना राबविणार असल्याचे सांगितले. विरोधकांनी सत्ता असताना देखील या भागाकडे कायम दुर्लक्ष केल्यामुळे पीटीआर व घरकुलाचा प्रश्न कायम रखडत पडला, पण आता मतदारांनीच विरोधकांना या बाबत जाब विचारला पाहिजे. आपल्या भागाचा विकास करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या सर्व उमेदवारांना प्रचंड मताधिक्याने विजयी करा असे आवाहन त्यांनी यावेळी केले.यावेळी कडूदास कांबळे,शेख निजाम, समाधान मस्के, बाबूराव बेद्रे, पप्पू बांडे, बाबू मामडे, बाबू उबदे, सुभाष उबदे, राहूल मामडे, सुरेश मामडे, सुभाष बाजूड, आकाश उबदे, महादेव मामडे, सागर मामडे, गोविंद सातूर, रवि मामडे, शंकर उबदे, अंबादास उबदे, शाम शेतुरे, मारुती मामडे, सखाराम बाजूड, राजू उबदे, संजू उबदे, सखाराम मामडे, गंगाराम मामडे, सुरेश उबदे यांच्यासह कार्यकर्ते



# राष्ट्रवादीच्या प्रचारासाठी सौ. विजेता पंडित यांच्या डोअर टू डोअर गाठीभेटी

## तय्यबनगरच्या महिला मतदारांनी घड्याळाचा गजर करण्याचा केला निर्धार

गेवराई (प्रतिनिधी)

गेवराई विधानसभा निवडणुकीतील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष पुरस्कृत नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. शितलताई दाभाडे यांच्यासह सर्व नगरसेवक पदाच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ सौ. विजेता विजयसिंह पंडित यांनी गेवराई शहरातील विविध प्रभागांचा प्रचार दौरा करून महिला मतदारांशी संवाद साधला. महिलांच्या सुरक्षिततेसाठी आणि विविध सुविधांसाठी गेवराई नगर परिषदेच्या माध्यमातून आपल्याला विविध कामे करायची असून माजी आ. अमरसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली गेवराई शहराचा कायापालट करून तिचे स्मार्ट शहरात रुपांतर करायचे आहे. त्यासाठी गेवराई नगर परिषदेवर राष्ट्रवादी काँग्रेसचा झेंडा फडकवावा असे आवाहन सौ. विजेता विजयसिंह पंडित यांनी केले.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. शितलताई महेश दाभाडे व प्रभाग क्र.११ मधील नगरसेवक पदाचे उमेदवार व दुर्दाना बेगम सलीमोद्दीन फारुकी यांच्या प्रचारार्थ आ. विजयसिंह पंडित यांच्या सुविद्य पत्नी सौ. विजेता पंडित यांनी डोअर टू डोअर मतदारांच्या गाठीभेटी घेऊन त्यांच्याशी संवाद साधला. यावेळी बोलताना त्या म्हणाल्या की, महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांनी महिलांच्या विकासासाठी महत्वाच्या अशा योजना राबविल्यवा आहेत. लाडकी बहिण



योजना सरकारने राबवून महाराष्ट्रातील लाडक्या बहिणींना आर्थिक भेट दिली. माजी आ. अमरसिंह पंडित व विद्यमान आ. विजयसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखाली महिला स्वयंसहाय्यता बचत गट, दारुलउलूम येथे शादीखाना बांधकाम, विविध चौकांचे सुशोभिकरण अशा विविध विकास कामांनी गती घेतलेली आहे. लहान मुलांसाठी संजयनगर, तय्यबनगर, इस्लामपूरा, कोरबु मोहल्ला, खडकपुरा आदी भागांत अंगणवाड्या सुरु करायच्या आहेत. गेवराई शहरात विविध प्रकारचे विकास कामे करून गेवराई शहर आपल्या स्मार्ट सिटी बनवायचे आहे, यासाठी घड्याळ या चिन्हासमोरील बटन दाबून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या उमेदवारासह सर्व नगरसेवक पदाचे उमेदवार विजयी करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

याप्रसंगी नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. शितलताई दाभाडे, नगरसेवक पदाचे उमेदवार माधव बेद्रे, दुर्दाणा बेगम सलीमोद्दीन फारुकी, वसीम फारुकी यांच्यासह नजमा बाजी, बुशरा बाजी, शेख शबाना बाजी, सय्यद आयशा, फिरदोस बाजी, शेख फरीदा, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी महिला आघाडीच्या सौ. मुक्ताताई आर्दड, सौ. पल्लवी गोगुले, सौ. अनिता काळे, सौ. योगीता तांबारे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुजीब भाईंना ताकद देण्यासाठी समाजाने घड्याळीच्या पाठीशी उभे राहणे काळाची गरज - वसीम लाला

## कोणत्याही आमीष आणि भूलथापांना मुस्लिमांनी बळी पडू नये

बीड (प्रतिनिधी) शहराच्या व मुस्लिम वस्त्यांच्या विकासासाठी आपल्या हक्काचा आणि कामाचा माणूस असलेल्या शेख मुजीब भाई यांना बळ देण्यासाठी समाजाने घड्याळीच्या पाठीशी उभे राहणे काळाची गरज आहे. पण तुम्हाला विविध आमिष दाखवलं जाईल त्या भूलथापांना फसून तुम्ही वेगळा निर्णय न घेता एकच मीशन प्रेमलता पारवे नगराध्यक्ष आणि अजित पवारंच्या राष्ट्रवादीची नगरपरिषदेत शासन हे धोरण राबविण्याचे आवाहन युवक कार्यकर्ता वसीम लाला यांनी केले आहे.



मागील ३० ते ४० वर्षांपासून एकाच घरात बीडची सत्ता असूनसुद्धा मुस्लिम बहुल भागात कोणत्याही सुविधा नाहीत. उकिरडा बरा अशी अवस्था मुस्लिम वस्त्यांची असून, पावसाळ्यात चिखल आणि उन्हाळ्यात हंडाभर पाण्यासाठी वणवण अशी मुस्लिमांची अवस्था करण्यात आली आहे. याला कारण केवळ नामधारी चेहरे पुढे करून सत्ता भोगली आहे. पण आता सामाजिक जाण असलेले शेख मुजीब भाई हे निवडणुकीच्या रणांगणात असून, ही नामी संधी मुस्लिमांसाठी आलेलली असून 'अभी नहीं तो कभी नहीं' हा विचार करुन बीड शहर आणि मुस्लिम बहुल भागातील समस्या सोडविण्यासाठी आणि शहरात शांतता आणि विकासाच्या नव्या वाटेवर घेऊन जाण्यासाठी शेख मुजीब भाई यांना ताकद देण्यासाठी समाजाने कोणत्याही आमिषाला बळी न पडता बीड नगरपरिषदेत राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा पवार पक्षाचे शासन हेच मिशन राबवून येत्या २ तारखेला घड्याळ या चिन्हावरील नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार प्रेमलता पारवे यांच्यासह सर्व नगरसेवक पदाच्या उमेदवारांना विजयी करावे असे आवाहन वसीम लाला यांनी केले आहे.

# औरंगाबाद काशीफुल उलूम मदरसाच्या माजी विद्यार्थ्यांचा मेळावा हजारोच्या संख्येने उपस्थित राहण्याचे मुफ्ती मिर्झा कलीम बेग यांचें आवाहन

प्रतिनिधी @ जिंतुर

राज्यातील छत्रपती संभाजी नगर मधील जमा मस्जिद स्थित अरबी धार्मिक मदरसा जामिया इस्लामीया काशीफुल उलूम च्या सर्व माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा दि २९ नोंहेबर रोजी शहरातील चंद्रगिरी लॉन्स मध्ये आयोजित केला असून या मेळाव्याला राज्यासह इतर राज्यातील माजी विध्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन मुफ्ती मिर्झा कलीम बेग यांनी केले आहे

या बाबत शनिवार दि २२ नोंहेबर रोजी पत्रकार परिषदेत माहिती देतांना ते म्हणाले की छत्रपती संभाजीनगर मधील जामा मस्जिद मधील अरबी धार्मिक मदरसा काशीफुल उलूम मध्ये १९६४ ते २०१५ पर्यत अध्यक्ष म्हणून मौलाना मोहंमद रियाजोद्दीन फारुकी नदवी हे काम पाहत होते या पन्नास वर्षाच्या कालावधीत त्यांनी मदरसा मध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक सुविधे सोबतच सर्व भौतिक सुविधा उपलब्ध करून दिल्या.या मदरसा मधून लाखो विध्यार्थी शिक्षण घेऊन वेगवेगळ्या मस्जिद मदरसा मध्ये आपले जीवन चांगल्या प्रकारे जगत आहे.दि २९ नोंहेबर रोजी या मदरसा मधील सर्व माजी विद्यार्थी पुन्हा एकत्र येणार असून त्या ठिकाणी १५ विध्यार्थ्यांना त्यांचे अनुभव कथन करता येणार असून उर्वरित विद्यार्थ्यांचे अनुभव एका ४०० पाणी पुस्तकात लिहण्यात आले असून या पुस्तकाची प्रस्तावना मुफ्ती कलीम बेग यांनी लिहले असून या पुस्तकाचे प्रकाशनप्रकाशन ही करण्यात येणार आहे अशी माहितीही त्यांनी या वेळी दिली.

# तारिख पे तारिख!

## स्थानिक स्वराज संस्था निवडणूक आरक्षण सुनावणी आता शुक्रवारी

प्रतिनिधी @ नवी दिल्ली



स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांतील ५० टक्क्यांहून अधिक आरक्षणाच्या मुद्द्यावर सर्वोच्च न्यायालयात आज (२५ नोव्हेंबर) महत्त्वपूर्ण सुनावणी पार पडली. निवडणूक प्रक्रिया जाहीर झाल्यानंतर ती थांबवता येत नाही, असे प्रतिपादन वरिष्ठ वकील जयसिंग यांनी केले. आरक्षणातील बहुतेक स्थानिक स्वराज्य संस्था आदिवासीबहुल क्षेत्रांत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. त्यावर मुख्य न्यायाधीशांनी लोकशाही सुरळीत चालेल याची आम्ही काळजी घेऊ. या विषयावर आज कोणतेही मत व्यक्त करत नाही, असे स्पष्ट करत सुनावणी पुढे ढकलण्याबाबत सुनावणीदरम्यान व्यक्त केलेल्या मतांचा उल्लेख केला. सॉलिसिटर जनरल यांनी या प्रकरणावर अधिक वेळ मागितला असून, तो स्वीकारत पीठाने पुढील सुनावणी शुक्रवारी ठेवली आहे.

मुख्य न्यायाधीशांनी पुढे म्हटले की, या प्रकरणावर आमचे मत आज व्यक्त करीत नाही; परंतु लोकशाही योग्य रितीने कार्यरत राहील याची हमी देऊ. ५० ते ६० टक्क्यांच्या वादात लोकांना प्रतिनिधित्व मिळत नाही. आम्ही निवडणुका घेण्याचे निर्देश देऊ शकतो आणि आमच्या आदेशांनुसार त्या पार पाडल्या जातील. आवश्यक असल्यास यावर मोठे खंडपीठही स्थापन करू, असेही त्यांनी सांगितले. वरिष्ठ वकील शेखर नाफाडे यांनी महत्त्वाचा मुद्दा उपस्थित केला. महाराष्ट्रातील काही भागांमध्ये ओबीसी समाजाची लोकसंख्या ९० टक्क्यांपर्यंत आहे. नंदुरबार जिल्हा त्यापैकी एक. संविधान पीठाने मतदारसंघाच्या लोकसंख्येनुसार आरक्षण असावे, असे स्पष्ट केले आहे. त्यामुळे काही ठिकाणी ५० टक्क्यांपेक्षा अधिक आरक्षण अपरिहार्य ठरते. त्याचप्रमाणे काही भागांत आदिवासींची लोकसंख्या ९९ टक्क्यांपर्यंत आहे. मग काय करावे? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

## वाल्मीक कराडची एवढीच आठवण येतेय, तर त्याच्यासोबत जाऊन
# बसा: प्रकाश सोळंके

प्रतिनिधी @ परळी



येथील नगर परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आयोजित जाहीर सभेत माजी मंत्री आणि सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार धनंजय मुंडे यांनी आपल्या एका जुन्या सहकारी मित्राची आठवण काढली आणि बीडच्या राजकारणात पुन्हा एकदा ठिणगी पडली. मुंडेंच्या या भावनाप्रधान वक्तव्याचा समाचार घेत त्यांच्याच पक्षाचे नेते आणि माजलगावचे आमदार प्रकाश सोळुंके यांनी त्यांना सणसणीत टोला लगावला आहे. तो नसल्याची एवढीच खंत वाटत असेल, तर त्याच्यासोबत जाऊन बसा आणि खंत दूर करा, असे सोळंके म्हणालेत.

परळी नगर परिषदेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीची प्रचारसभा आयोजित करण्यात आली होती. या सभेला भाजप नेत्या पंकजा मुंडे आणि धनंजय मुंडे एकाच मंचावर उपस्थित होते. आपलं भाषण संपवताना धनंजय मुंडे यांनी कोणाचेही नाव न घेता, आज या ठिकाणी एका व्यक्तीची अनुपस्थिती प्रकर्षाने जाणवत आहे, अशी भावना व्यक्त केली. मुंडेंचा हा रोख त्यांचे एकेकाळचे सावलीसारखे सहकारी वाल्मीक कराड यांच्याकडे होता, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली.

# जिल्हा परिषदेत संविधान दिन उत्साहात साजरा; नागरी शिस्त ही सामूहिक जबाबदारी- भार्गवी मुंढे



नांदेड जिल्हा प्रतिनिधी- नागरी शिस्त राखण्याची जबाबदारी ही व्यक्ती, संस्था आणि प्रशासन या तिघांचीही संयुक्त आहे. सामूहिक जबाबदारीनेच समाज प्रगतिपथावर चालू शकतो, असे प्रतिपादन मुख्यमंत्री फेलो भार्गवी मुंढे यांनी केले.

नांदेड जिल्हा परिषदेच्या वतीने आज यशवंतराव चव्हाण सभागृहात संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडला. उपमुख्य कार्यकारी अधिकारी डी. बी. गिरी, समाजकल्याण अधिकारी सत्येंद्र आऊलवार, मुख्यमंत्री फेलो भार्गवी मुंढे, जिल्हा कृषी अधिकारी डॉ. नीलकुमार ऐतवडे, प्राथमिक शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे, नियोजन शिक्षणाधिकारी दिलीप बनसोडे, लेखाधिकारी निळकंठ पाचंगे, उपशिक्षणाधिकारी अवधूत गुंजेवार आदींची उपस्थिती होती.

मुंढे यांनी विविध राज्यांचे उदाहरण देत नागरी शिस्त व संविधानिक मूल्यांवर विवेचन केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दाखविलेल्या मार्गाने सामूहिक जबाबदारी स्विकारली तर विकासाचा मार्ग सर्वांसाठी प्रशस्त होतो, असे त्या म्हणाल्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक समाज कल्याण अधिकारी सत्येंद्र आऊलवार यांनी केले. त्यांनी संविधान दिनाचे महत्त्व स्पष्ट करत २६ नोव्हेंबर ते २६ जानेवारी २०२६ या कालावधीत घर-घर संविधान उपक्रमांतर्गत प्रत्येक घरापर्यंत संविधान उद्देशिका पोहोचविण्यात येणार असल्याची माहिती दिली.

प्रारंभी मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांच्या हस्ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर सभागृहातील सर्वांनी भारताच्या संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन केले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी मिलिंद व्यवहारे यांनी केले. या प्रसंगी जिल्हा परिषदेचे कर्मचारी रणजीत गजभारे यांच्या वतीने लाडूंचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमास मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचे स्वीय सहाय्यक बालाजी नागमवाड, शुभम तेलेवार, शशिकांत गोले, गंगाधर माचनवाड, विजय वाघमारे, रणजीत गजभारे, सोपान खिल्लारे, राजेश जोंधळे, साईचरण मुगावे, शिवसांब चेडू, गजेंद्र श्रीरामवार, कुलदीप जोशी, बालाजी आवर्दे उज्ज्वला गजभारे, शालिनी शेळके, प्रतिभा चोळाखेकर, वैशाली थोरात, मोहिनी जाधव, स्नेहल वळसे, पूजा सोनटक्के, सुरज नाईक, राजेश तावडे, अशोक पंडित आदींसह जिल्हा परिषदेचे अधिकारी-कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मांडवा येथे ड. प्रतीक केराम यांच्या हस्ते फलकाचे अनावरण



किनवट / प्रतिनिधी

दि २६ नोव्हेंबर रोजी मांडवा येथे आज आदिवासी समाजाचे महान क्रांतिकारी बिरसा मुंडा व आदिवासी समाजातील पुरोगामी नेता शामा कोलाम यांच्या जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमात त्यांच्या नावाचे व छायाचित्र असलेले फलकाचे अनावरण युवा नेते ड. प्रतीक केराम यांच्या हस्ते संपन्न झाला. यावेळी राष्ट्रीय जनजाती आयोगाचे वरिष्ठ अन्वेषक गोवर्धन मुंडे, विहिंप चे अनिरुद्ध केंद्रे व ओबीसी नेते बाबुराव केंद्रे यांची प्रमुख उपस्थिती होती.

जयंतीच्या औचित्याने ग्रामस्थांनी एकत्र येत दोन्ही महान व्यक्तिमत्त्वांच्या कार्यातून प्रेरणा घेण्याचा संकल्प व्यक्त केला. कार्यक्रमाला प्रतिष्ठित मान्यवरांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली. यामध्ये भाजपा महिला मोर्चाच्या अध्यक्षा सौ. सागरताई शिंदे, ग्रामपंचायतचे सरपंच गोविंद आत्राम, ग्रामसेवक आरमाळकर, उपसरपंच रविकांत वडलवार, देवराव येंड्रलवार, कमलबाई कुमरे, रामू धुर्वे, सरस्वती आत्राम,कृष्णकमल नाडकुंटीवार , अविनाश मुंडे, अजय शिंदे यांचा समावेश होता.

महिला व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित राहिल्याने कार्यक्रमाला जनआशीर्वाद लाभला. उपस्थित मान्यवरांनी बिरसा मुंडा आणि शामा कोलाम यांच्या संघर्षमय आयुष्याचा आढावा घेत त्यांच्या विचारातून आदिवासी समाजाला नेहमीच प्रेरणा मिळत राहील, असे सांगितले. यावेळी युवा नेते ड. प्रतीक केराम यांनी समाजाच्या प्रगतीसाठी एकजूट आणि शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. जयंतीचे औचित्य साधून आयोजित हा फलक अनावरण सोहळा अत्यंत यशस्वी आणि प्रेरणादायी ठरला.

# उमेदवारांना निवडणुक चिन्हांचे वाटप करण्यात आले



किनवट /प्रतिनिधी दि. २६ : किनवट नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या अनुषंगाने निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या टप्प्याटप्प्याच्या कार्यक्रमानुसार आज (ता. २६) नामांकनपत्रांची छाननी पूर्ण झाल्यानंतर वैध उमेदवारांना निवडणूक चिन्हांचे वाटप करण्यात आले. ही प्रतीक्षेत असलेली आणि अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया निवडणुक निर्णय अधिकारी तथा तहसिलदार डॉ. शारदा चौडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली अत्यंत शांततेत आणि सुरळीत पार पडली. यावेळी सहाय्यक निवडणूक अधिकारी तथा मुख्याधिकारी विवेक कांदे, अतिरिक्त सहाय्यक निवडणूक अधिकारी चंद्रशेखर सहारे तसेच नगर परिषदेचे अधिकारी सुधीर सरोदे उपस्थित होते.

कार्यवाही दरम्यान मान्यताप्राप्त राष्ट्रीय व नोंदणीकृत पक्षांच्या उमेदवारांना त्यांच्या पक्षासाठी नियुक्त केलेली अधिकृत निवडणूक चिन्हे देण्यात आली. तर अपक्ष उमेदवारांना त्यांनी नामांकनपत्रामध्ये नमूद केलेल्या पसंती क्रमांकानुसार चिन्हे वाटण्यात आली. नगराध्यक्ष पदासाठी दोन अपक्ष उमेदवार- सुमैय्या अंजुम अब्दुल मलिक आणि शबाना अखिल खान- या दोघींनी 'बॅट' हेच चिन्ह पहिल्या पसंतीने निवडले होते. त्यामुळे या निवडणूक चिन्हावर सोडत घेण्यात आली. विशेष म्हणजे ही इश्वर चिठ्ठी शाळकरी विद्यार्थी सरयु युवराज पवार आणि उबेद शेख अन्सार यांच्या हस्ते काढण्यात आली. यात 'बॅट' हे चिन्ह शबाना अखिल खान यांच्या नावे निघाले, तर सुमैय्या अंजुम यांना 'टोकरी' हे चिन्ह देण्यात आले. निवडणूक चिन्ह वाटपाची ही प्रक्रिया कोणताही अनावश्यक गोंधळ होऊ न देता नियमानुसार अतिशय सुरळीतरीत्या पूर्ण झाली. यावेळी पोलिस निरीक्षक गणेश कराड यांच्या मार्गदर्शनाखाली परिसरात योग्य बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# शिक्षकांनी अंतर्मुख होण्याची गरज – सोलापूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. बी. पी. बंडगर



नांदेड जिल्हा प्रतिनिधी

एक पुस्तक शंभर शिक्षकांच्या बरोबरीचे असते आणि एक चांगला शिक्षक संपूर्ण ग्रंथालयाच्या तोलामोलाचा असतो, अशी व्याख्या आपण ऐकत आलो आहोत. पूर्वी शिक्षकांची अध्यापनशैली देणगीभावाने आणि निष्ठेने परिपूर्ण होती. मात्र काळाच्या ओघात शिक्षणव्यवस्थेमध्ये आणि शिक्षकांच्या भूमिकेमध्ये मोठे बदल झाले आहेत. आजच्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती पाहता शिक्षकांनी स्वतःकडे अंतर्मुख होण्याची तातडीची गरज आहे, असे प्रतिपादन सोलापूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू तथा स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील रसायनशास्त्र संकुलाचे माजी संचालक डॉ. बी. पी. बंडगर यांनी केले. ते दि. २२ नोव्हेंबर रोजी विद्यापीठाच्या अधीसभा सभागृहात आयोजित कुलगुरू व्याख्यानमाला या कार्यक्रमातील पहिल्या व्याख्यानात बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन होते. यावेळी समन्वयक डॉ. एस. जी. गट्टानी, डॉ. कृष्णा चैतन्य, रसायनशास्त्र संकुलाच्या संचालिका डॉ. संगीता माकोणे आदींची प्रमुख उपस्थिती होती. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या मार्गदर्शनाखाली या व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले असून पहिल्या पुष्पात डॉ. बंडगर यांनी जगावे तरी कसे! या विषयावर प्रेरणादायी व्याख्यान दिले. आपल्या प्रभावी संवादात ते म्हणाले की, आयुष्य तीन गोष्टींकडून प्रेरणा घेऊन जगावे. निसर्गाकडून : निरपेक्ष भावनेने जगणाऱ्या आणि कोणताही मोबदला न घेता ऊर्जा देणाऱ्या निसर्गाकडे पाहून जगण्याची प्रेरणा मिळते. मित्रांकडून : जीवनातील वेदना कमी करणारे, सदैव मदतीसाठी धावून येणारे खरे मित्र जीवनाला अर्थपूर्ण करतात. शिक्षकांकडून : जगावे कसे हे शिकवणारे, जीवनाला दिशा देणारे शिक्षक आपल्याला घडवत राहतात आणि त्यांच्या कृतज्ञतेखालीच आपण मोठे होत जातो. आपल्या जगण्याने इतरांना हेवा वाटावा असे जगावे, असा प्रेरणादायी संदेश देत त्यांनी व्याख्यानाचा समारोप केला.

## बरबडा येथे संविधान दिनानिमित्त गंगाधर बडुरे यांच्या डोळस संकल्पनेतून जिल्हा परिषद शाळेत शालेय साहित्य वाटप



नायगाव तालुक्यातील बरबडा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व कन्या शाळात संविधान दिनानिमित्त गंगाधर बडुरे जिल्हा प्रमुख शिवसेना शिंदे गट यांच्या डोळस संकल्पनेतून बरबडा येथील आपन जिल्हा परिषद शेळेसाठी काहीतरी देणे लागतो या डोळस संकल्पनेतून शालेय साहित्य वही पेन कंपास

पेटी याच वाटप करण्यात आले आहे गंगाधर बडूरे यांच्या संकल्पतेतुन बरबडा सर्कल मधील सर्व जिल्हा परिषद शाळेत शालेय साहित्य वाटप करण्याचा केला आहे. त्याची सुरवात या बरबडा येथील शाळेतून करण्यात आली आहे.

यावेळी शिवप्रसाद बडूरे व पत्रकार किरण हनमंते यांच्या हस्ते सर्व विद्यार्थी यांना हे साहित्य वाटप केले आहे त्यावेळी केंद्रिय मुख्याध्यापक एम. व्हि. रेडेवाड, सहशिक्षक पि. एम. शिंगेवाड, एस. एन. वजीरगावकर, डी. पि. सुरणे, एस. एम. शेवाळे, डि. आर. अंबुलगे, एम. एन. भदरगे त्याचबरोबर गावातील तरुण प्रतीक जाधव, पवन बडूरे, बालाजी नागधरे, पंटू सुपारे, शंकर पचलिंग, माधव धुमाळे, योगेश पचलिंग, हरी वटपलवाड इत्यादी ची उपस्थिती होती.

## धडाडीचे शिवसैनिक मारोती सुंकलवाड यांची लोककल्याण ग्राहक संस्थेच्या जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती; ग्राहक हितासाठी कार्य करण्याचा निर्धार




किनवट /प्रतिनिधी

जिल्ह्यातील महत्त्वाच्या 'दिशा' समितीचे अशासकीय सदस्य, धडाडीचे शिवसैनिक आणि माजी पंचायत समिती सभापती मारोती सुंकलवाड यांची 'लोककल्याण ग्राहक संस्थे'च्या नांदेड जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. ग्राहक हक्कांचे संरक्षण आणि ग्राहक हित जपणारे कार्य सुंकलवाड यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यात अधिक प्रभावीपणे राबवले जाईल, असा विश्वास याप्रसंगी व्यक्त करण्यात आला. या निवडीचे अधिकृत पत्र गोदावरी अर्बनच्या मुख्य कार्यालयात आयोजित एका छोटेखानी कार्यक्रमात सुंकलवाड यांना सुपूर्द करण्यात आले. 'ग्राहक कल्याण संस्थे'चे राष्ट्रीय अध्यक्ष दिनकर आमकर यांच्या प्रमुख उपस्थितीत, राज्याचे मंत्री तथा विधान परिषद आमदार हेमंत पाटील यांच्या हस्ते हे नियुक्तिपत्र प्रदान करण्यात आले.

यावेळी संस्थेचे विविध पदाधिकारी, शिवसैनिक तसेच आमदार हेमंत पाटील यांचे संपर्क अधिकारी सुनील गरड पाटील आणि योगेश जायभाये यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. मारोती सुंकलवाड हे राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात एक सक्रिय आणि परिचित नाव आहे. पंचायत समिती सभापती म्हणून त्यांनी आपल्या कार्यकाळात सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी धडाडीने काम केले आहे. त्यांची 'दिशा' समितीवरील अशासकीय सदस्य म्हणून असलेली भूमिका देखील महत्त्वाची आहे.

'लोककल्याण ग्राहक संस्थे'च्या जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर, सुंकलवाड यांनी जिल्ह्यातील प्रत्येक नागरिकाला ग्राहक म्हणून असलेल्या त्यांच्या हक्कांविषयी जागरूक करणे, ग्राहकांची फसवणूक थांबवणे आणि त्यांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी प्रभावी यंत्रणा उभी करणे, हे आपले मुख्य उद्दिष्ट असल्याचे सांगितले. त्यांच्या या निवडीमुळे ग्राहक संरक्षण चळवळीला जिल्ह्यात एक नवीन बळ मिळेल, असा विश्वास राष्ट्रीय अध्यक्ष दिनकर आमकर यांनी व्यक्त केला. सुंकलवाड यांच्या नियुक्तीबद्दल जिल्ह्यातील राजकीय आणि सामाजिक वर्तुळातून अभिनंदन केले जात आहे.

## नागोराव विठ्ठलराव धांडे पाटील यांचे निधन



अर्धापूर (प्रतिनिधी) शहरातील अमृतनगर भागातील जेष्ठ नागरिक तथा उर्ध्व पैनगंगा प्रकल्पाचे सेवानिवृत्त कर्मचारी नागोराव विठ्ठलराव धांडे पाटील ( वय ६५ वर्ष)यांचे राहत्या घरी अल्पशा आजाराने दि.२६ बुधवारी रोजी राहत्या घरी स.७ -३० वा.निधन झाले आहे.त्यांच्यावर अर्धापूर येथील स्मशानभूमीत दुपारी ४ वा.अंत्यस्कार करण्यात आले.

नागोराव धांडे पाटील यांच्या पाश्चात्य पत्नी,दोन मुले,एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. ते वेदांत कॉम्प्युटरचे संचालक संदीप धांडे,संतोष धांडे यांचे वडील होत.

# स्वारातीम विद्यापीठात संविधान दिन उत्साहात साजरा



नांदेड जिल्हा प्रतिनिधी

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. प्रशासकीय इमारतीतील स्वागत कक्षामध्ये आयोजित कार्यक्रमात भारतीय संविधान शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. उपस्थित अधिकारी, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांनीही पुष्प अर्पण करून आदर व्यक्त केला.

यानंतर कुलगुरू डॉ. चासकर यांच्या उपस्थितीत भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. तसेच विद्यापीठ परिसरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर अध्यासन केंद्रासह विविध संकुलांमध्येही उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले.

कार्यक्रमास विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे, वित्त व लेखाधिकारी डॉ. पराग भालचंद्र, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. शैलेश वाढेर, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. मारुती गायकवाड, आयक्यूएसी सेलचे संचालक डॉ. सुरेंद्रनाथ रेड्डी, दूरशिक्षण विभागाचे संचालक डॉ. प्रकाश निहलानी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन केंद्राच्या समन्वयक डॉ. सुनिता पाटील, डॉ. अविनाश कदम, जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम, सहायक कुलसचिव रामदास पेद्देवाड तसेच प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संविधान दिनानिमित्त सर्वांनी भारतीय संविधानातील मूल्ये जपण्याची आणि लोकशाही बळकटीसाठी योगदान देण्याची प्रतिज्ञा केली .

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला.